
मंगळवार, २३ ऑगस्ट २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक ३७
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## थेट नगराध्यक्ष, सरपंचपद निवडीची विधेयके मंजूर



**मुंबई :** महाराष्ट्रातील आगामी नगरपालिका निवडणुकांमध्ये नगराध्यक्षपदाची निवड थेट जनतेतून करण्याच्या निर्णयाला सोमवारी (दि. २२) विधानसभेत मंजुरी देण्यात आली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाची निवडदेखील जनतेतून करण्याचा निर्णय घेतला आहे. या विधेयकालाही विधानसभेत बहुमताच्या जोरावर मंजुरी देण्यात आली. महाविकास आघाडी सरकारने घेतलेले निर्णय बदलून हे दोन्ही निर्णय घेण्यात आले आहेत. विधानसभेतील संख्याबळाच्या जोरावर शिंदे-फडणवीस सरकारने दोन्ही विधेयके मंजूर करून घेतली. आता या विधेयकांना राज्य विधिमंडळाच्या वरिष्ठ सभागृहात मंजुरी मिळवावी लागणार आहे. त्यामुळे विधान परिषदेत ही दोन विधेयके मांडली जातील.

अंतरंग
'कोकणातील रस्त्यांचे काम २५ ऑगस्टपूर्वी पूर्ण करा'/२
सरसगडाच्या पायऱ्यांवरून घसरून तरुण पडला/७
भारताच्या शुभमन गिलचे पहिलेवहिले शतक/८

# कर्नाळा बँक घोटाळ्यातील दोषींवर लवकरात लवकर कारवाई करणार

## ▌उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची विधिमंडळात माहिती

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

कर्नाळा नागरी सहकारी बँक घोटाळ्यासंदर्भात मी स्वतः लक्ष घालत आहे आणि त्या अनुषंगाने या बँकेच्या घोटाळ्यातील दोषींवर लवकरात लवकर कारवाई होणार असल्याची माहिती राज्याचे उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २२) पावसाळी अधिवेशनादरम्यान विधिमंडळात दिली.




रायगड जिल्ह्यातील कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील तसेच प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभागी असणाऱ्या संचालक व अधिकाऱ्यांनी कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा केला असल्याचे सिद्ध झाले आहे. त्या अनुषंगाने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेल्या तपासणीत बँकेने मंजूर केलेल्या कर्ज प्रकरणामध्ये गंभीर आक्षेप नोंदविल्याचे निदर्शनास आले असून या आर्थिक घोटाळ्यात बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील यांना ईडीकडून अट केली गेली आहे. जवळपास एक वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनसुद्धा बँक घोटाळ्यात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभागी असलेल्या संचालक व अधिकाऱ्यांवर अद्यापपर्यंत कोणतीच कारवाई झाली नाही. या घोटाळ्यासंदर्भात वारंवार निवेदनाद्वारे व सभागृहात निदर्शनास आणूनसुद्धा शासनामार्फत जाणूनबुजून दुर्लक्ष केले जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. या घोटाळ्याचा तपास आर्थिक गुन्हे अन्वेषण विभागाकडे वर्ग केला जात असताना बँकेतील खातेदार व ठेवीदारांना त्यांची बँकेत ठेवलेली रक्कम तातडीने देण्याची तसेच गैरव्यवहारात सहभागी असणाऱ्या संचालक व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, अशी लक्षवेधी सूचना आमदार महेश बालदी, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार समीर कुणावार, आमदार मनीषा चौधरी, आमदार अमित साटम यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५नुसार दाखल केली होती. ही लक्षवेधी सूचना विधिमंडळाच्या सभागृहात आमदार महेश बालदी यांनी सोमवारी उपस्थित केली.

विधिमंडळात लक्षवेधी सूचना मांडताना आमदार महेश बालदी यांनी म्हटले की, कर्नाळा बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील, संचालक, आणि सीईओ यांनी भ्रष्टाचार केला हे सीआयडी चौकशीतही स्पष्ट झाले आहे. त्या अनुषंगाने एफआयआर दाखल होऊन दोन वर्षे झाली. हा भ्रष्टाचार एवढा मोठा आणि गंभीर असतानाही ५० हजार ठेवीदारांना धोका देणारे विवेक पाटील, संचालक व अधिकाऱ्यांवर शासनाने आजपर्यंत कोणतीही गंभीर कारवाई केली नाही. मुख्य आरोपी विवेक पाटील यांना फक्त ईडीने अटक केली, मात्र संचालक, अधिकारी अजूनही मोकळे आहेत. त्यांना कोणता राजाश्रय प्राप्त झाला आहे की, ५५० कोटी रुपयांचा घोटाळे करणारे मुक्तपणे फिरत आहेत, असा सवालही त्यांनी सभागृहामध्ये उपस्थित करीत उर्वरित ठेवीदारांना पैसे मिळावेत, अशी पुनर्मागणी केली.

या वेळी उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात लक्षवेधीवर सांगितले की, कर्नाळा नागरी सहकारी बँक घोटाळा गंभीर घोटाळा आहे. केंद्र सरकारच्या डीआयसीजीसीने पाच लाख रुपयांची रक्कम संरक्षित केल्यामुळे ठेवीदारांना जवळपास ३५८ कोटी ९६ लाख रुपये मिळाले आहेत, पण ज्या ठेवीदारांची रक्कम पाच लाखांपेक्षा जास्त आहे त्यांचे पैसे अद्याप त्यांना मिळाले नाहीत. बँकेचे अध्यक्ष विवेक पाटील ईडीच्या कोठडीत आहेत, तर इतर संचालक व अधिकारी यांच्यावर पॅरलल केस सीआयडीमध्ये चाललेली आहे. या घोटाळ्याची व्याप्ती मोठी आहे. त्यामुळे स्वतंत्रपणे प्रत्येक संचालकाचा व अधिकाऱ्याचा सहभाग तपासणार असून तसे तत्काळ निर्देश देण्याचे जाहीर करतानाच या संदर्भातील पुरावे गोळा करून लवकरात लवकर कारवाई करणार असल्याचे फडणवीस यांनी सभागृहात जाहीर केले.

*लक्षवेधी सूचनेवर उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी दिलेले निवेदन* /पान २ वर..

(छाया : महेश शिंदे)



# मोदी सरकारच्या माध्यमातून देशातील गोरगरीबांचे कल्याण

## ■ केंद्रीय मंत्री प्रल्हादसिंह पटेल यांचे प्रतिपादन

**महाड : प्रतिनिधी**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळ गोरगरीबांच्या कल्याणासाठी अनेक योजना राबवित आहेत. देशातील नागरिकांना अन्न-पाणी पुरविण्याची जबाबदारी राज्य सरकारांची असतानाही आज पंतप्रधान मोदी केंद्राच्या माध्यमातून मोठा वाटा उचलत आहेत, असे प्रतिपादन केंद्रीय अन्न प्रक्रिया आणि जलशक्तीमंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी सोमवारी (दि. २२) केले. रायगड लोकसभा प्रवास कार्यक्रमादरम्यान महाड येथे आयोजित लाभार्थी मेळाव्यात ते बोलत होते.



या मेळाव्याला भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, ज्येष्ठ नेते माजी आमदार डॉ. विनय नातू, सरचिटणीस अविनाश कोळी, उपाध्यक्ष राजेश मपारा, मिलिंद पाटील, बिपीन महामुणकर, महाड तालुकाध्यक्ष जयवंत दळवी, पोलादपूर तालुकाध्यक्ष प्रसन्ना पालांडे, रोहा तालुकाध्यक्ष सोपान जांबेकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित घाग, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष मानसी मानकर, नीलिमा भोसले, मंजुषा कुद्रमूती आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

लाभार्थी मेळाव्याला मार्गदर्शन करताना केंद्रीय मंत्री प्रल्हादसिंह पटेल यांनी एकेकाळी प्रगत व देशात नंबर एक असलेल्या महाराष्ट्राची प्रगती का मंदावली, असा टोला आधीच्या आघाडी सरकारला लगावला.

या वेळी पदाधिकाऱ्यांनी आपले विचार मांडले, तर लाभार्थ्यांनीदेखील भावना व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र सरकारला धन्यवाद दिले.

## निवडक

### भाजप नेत्याच्या हत्येचा डाव उधळला; दहशतवादी अटकेत

**मॉस्को :** रशियन फेडरल सिक्युरिटी ब्युरोने इस्लामिक स्टेट या दहशतवादी संघटनेच्या दहशतवाद्याला अटक केली आहे. सुसाईड बॉम्बर असलेला हा दहशतवादी भारतात भाजपच्या एका बड्या नेत्याच्या हत्येच्या तयारीत होता. हा दशहतवादी मध्य आशियातील देशाचा रहिवासी असून त्याची तुर्कस्तानात भरती झाली होती.

### चित्रपट निर्माते ए. जी. नाडियादवाला यांचे निधन



**मुंबई :** प्रख्यात बॉलीवूड चित्रपट निर्माते अब्दुल गफ्फार नाडियादवाला यांचे दीर्घ आजाराने सोमवारी (दि. २२) मध्यरात्री १.४०च्या सुमारास निधन झाले. ते ९१ वर्षांचे होते. मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आला. त्यात त्यांची प्राणज्योत मालविली, अशी माहिती त्यांचा मुलगा मुश्ताक नाडियादवाला यांनी दिली.

पत्राचाळ घोटाळा प्रकरण

# संजय राऊतांच्या न्यायालयीन कोठडीत ५ सप्टेंबरपर्यंत वाढ

**मुंबई : प्रतिनिधी**

पत्राचाळ घोटाळाप्रकरणी शिवसेना खासदार संजय राऊत यांच्या न्यायालयीन कोठडीत ५ सप्टेंबरपर्यंत वाढ करण्यात आली आहे. राऊत सध्या आर्थर रोड कारागृहात आहेत.



मुंबईतील गोरेगाव येथील पत्राचाळ घोटाळाप्रकरणी सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) संजय राऊतांना १ ऑगस्टला नऊ तासांच्या चौकशीनंतर अटक केली होती. त्यानंतर दोन वेळा जामीन नाकारत पीएमएलए न्यायालयाने त्यांची कोठडी कायम ठेवली. न्यायालयीन कोठडी संपत असल्याने सोमवारी (दि. २२) पुन्हा एकदा राऊतांना न्यायालयात हजर करण्यात आले होते. या वेळी त्यांच्या न्यायालयीन कोठडीत ५ सप्टेंबरपर्यंत वाढ करण्यात आली.

पत्राचाळ परिसरातील बैठ्या घरांचा पुनर्विकास करण्यासाठी २००८मध्ये मे. गुरू-आशीष कन्स्ट्रक्शन्सची रहिवाशांनी नियुक्ती केली. ही घरे भाडेतत्त्वावर असल्याने त्यासाठी म्हाडाची परवानगी आवश्यक होती. म्हाडानेही तयारी दाखवत विकसक आणि सोसायटीसमवेत करारनामा केला. या अंतर्गत मूळ रहिवाशांचे मोफत पुनर्वसन केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या बांधकामामध्ये विकसक आणि म्हाडामध्ये समान हिस्सा राहणार होता, मात्र या जागी बांधलेली घरे काही व्यावसायिकांना वाटून देण्यात आली. त्यातून प्रवीण राऊतांनी तब्बल १,०७४ कोटी रुपये जमविले. हे पैसे त्यांनी त्यांचे मित्र आणि निकटवर्तीयांच्या खात्यात वळते केले. यातील ८३ लाख रुपये प्रवीण यांच्या पत्नीने संजय राऊतांच्या पत्नी वर्षा यांच्या खात्यात जमा केले.

# महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावरील सुनावणी पुन्हा लांबणीवर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर सोमवारी (दि. २२) सर्वोच्च न्यायालयात होणारी सुनावणी पुन्हा लांबणीवर गेली आहे. आता ही सुनावणी मंगळवारी (२३ ऑगस्ट) होण्याची शक्यता आहे. न्यायालयातील त्रिसदस्यीय खंडपीठातील एक न्यायमूर्ती उपलब्ध नसल्यामुळे ही सुनावणी लांबणीवर गेल्याचे समजते.

महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा पेच अद्याप सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीत तारीख पे तारीखचे सत्र सुरू झाले आहे. यापूर्वी हे प्रकरण २२ तारखेला सहाव्या क्रमांकावर सुनावणीसाठी सर्वोच्च न्यायालयात होते, पण आता पुन्हा लांबणीवर गेल्याने २३ ऑगस्ट म्हणजेच मंगळवारी तरी सुनावणी होणार का याबाबत उत्सुकता आहे.

दरम्यान, महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षासंदर्भात सर्वोच्च न्यायालयासमोर एकूण सहा याचिका आहेत. सर्व सहा याचिका एकत्रित करून घटनापीठाकडे देण्यास कोणीही अद्यापपर्यंत विरोध दर्शविलेला नाही. त्यामुळे सर्व सहा याचिका एकत्रितपणे घटनापीठाकडे सोपवल्या जातील, अशी शक्यताही नाकारता येत नाही.

# ओबीसी आरक्षणासंदर्भात विशेष खंडपीठ होणार स्थापन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

राज्यातील ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावर विशेष खंडपीठ स्थापन केले जाणार आहे. तोपर्यंत म्हणजेच पुढील पाच आठवड्यांसाठी परिस्थिती जैसे थे ठेवावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.



२० जुलै रोजी न्यायालयाने ओबीसी आरक्षणाला मान्यता दिली होती. त्याचवेळी न्यायालयाने हे आरक्षण ज्या ३६७ स्थानिक स्वराज्य संस्थांमधील निवडणुकांची आधीच घोषणा झाली आहे तिथे लागू करता येणार नाही असेही स्पष्ट केले होते. या संदर्भात शिंदे-फडणवीस सरकारने सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. यामध्ये राज्यातील निवडणूक आयोगाने ३६७ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये निवडणुकीसंदर्भात जारी केलेल्या निर्देशांना मागे घेण्याची विनंती करण्यात आली होती. या याचिकेवर सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा, न्या. अभय ओक, न्या. जे. बी. पार्दीवाला यांच्या देखरेखीखाली सुनावणी झाली.

सरकारच्या याचिकेवर चार ते सहा आठवड्यानंतर सुनावणी केली जाईल. त्यानुसार किमान पाच आठवडे तरी परिस्थिती सध्या आहे तशीच ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले असून विशेष खंडपीठाची स्थापना करणार असल्याचे कोर्टाने म्हटले आहे.

# पनवेल-कर्जत उपनगरीय रेल्वे प्रकल्पातील अडथळा दूर

## वनजमीन हस्तांतरित करण्यास केंद्राची मंजुरी

**मुंबई : प्रतिनिधी**

पनवेल-कर्जत नवीन उपनगरीय दुहेरी मार्ग प्रकल्पासाठी आवश्यक असलेली वनजमीन मुंबई रेल्वे विकास महामंडळाला (एमआरव्हीसी) हस्तांतरित करण्यास केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे या प्रकल्पातील मोठा अडथळा दूर झाला असून प्रकल्पाआड येणारे वृक्ष हटवून लवकरच रेल्वेमार्गाच्या कामाला सुरुवात करण्यात येणार आहे.



सध्या पनवेल-कर्जतदरम्यान एकच मार्गिका असून या मार्गिकेच्या वापर लांब पल्ल्याच्या गाड्या व मालवाहतुकीसाठी होत आहे. कर्जत आणि पनवेलमधील प्रवाशांना ठाणे किंवा कुर्लामार्गे लोकलने जावे लागते. अन्यथा रस्ते वाहतुकीचा पर्याय निवडावा लागतो, मात्र त्यात बराच वेळ वाया जातो. पनवेल-कर्जत अशी थेट लोकल सुरू झाल्यास त्याचा फायदा अनेक प्रवाशांना होऊ शकतो. त्यासाठी येथे नवीन उपनगरीय मार्गिका बनवण्याचा निर्णय घेण्यात आला होता. एमयूटीपी ३ अंतर्गत एमआरव्हीसीने या मार्गिकेचे काम हाती घेतले.

दुहेरी मार्गासाठी सरकारी, खासगी आणि वन अशा एकूण १३५.८९३ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. यापैकी १०१.०९० हेक्टर म्हणजेच ७४ टक्के भूसंपादन झाले असून २५.६१ टक्के भूसंपादन बाकी आहे. त्यापैकी नऊ हेक्टरवरील वनजमिनीचा प्रश्न सुटल्याची माहिती एमआरव्हीसीमधील अधिकाऱ्यांनी दिली.

पनवेल-कर्जत मार्ग सध्याच्या मार्गाला समांतर बांधण्यात येत आहे. सध्याच्या मार्गावर दोन बोगदे आहेत. नव्या मार्गावर तीन बोगदे असतील. या मार्गासाठी सुमारे १,८०० झाडे तोडावी लागणार आहेत. वृक्षतोड केल्यानंतर सुमारे नऊ हजार नवीन झाडे लावण्यात येणार आहेत.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर चौथी मार्गिका विचाराधीन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गाच्या चौथ्या मार्गिकेचा विस्तार करण्याबाबत राज्य शासन विचार करेल, असे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी (दि. २२) विधानसभेत सांगितले. लक्षवेधी सूचनेस उत्तर देताना त्यांनी ही माहिती दिली.



उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर वाहतूक खूप वाढली आहे. या महामार्गावरील वाहतुकीचे नियमन करण्यासाठी इंटेलिजन्ट ट्राफिक मॅनेजमेंट सिस्टीम अंमलात आणली जाईल. या सिस्टीममध्ये आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर केला जाईल. यामुळे लेन सोडून वाहतूक करणाऱ्यांची माहिती तत्काळ मिळेल. अपघातग्रस्तांना तातडीने मदत मिळण्यासाठी यंत्रणा विकसित करण्यात येईल. अपघात टाळण्यासाठी प्रशिक्षण आणि जनजागृती मोहीमही राबविली जाईल.

एक्स्प्रेस वेवर झालेल्या आमदार विनायक मेटे यांच्या अपघाती मृत्यूची चौकशी राज्य गुन्हे अन्वेषण विभागाकडे सोपविण्यात आली आहे. त्याचबरोबर त्यांना मदत मिळण्यात काही उणीवा राहिल्या का हे तपासण्यासाठीही अतिरिक्त पोलीस महासंचालक दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येईल, असेही उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

## वेध गणेशोत्सवाचे...



**मुरूड : महाराष्ट्रातील सर्वांत मोठा उत्सव अर्थात गणेशोत्सव जवळ आल्याने गणेशमूर्ती कारखान्यांमध्ये कारागिरांची लगबग वाढल्याचे दिसून येते. कारागिर सध्या बाप्पाला रंगरंगोटी आणि आभूषणांची सजावट करण्यात मग्न आहेत.** (छाया : सुधीर नाझरे)

# आता निवडणुका होऊ शकत नाहीत

## ओबीसी आरक्षणावरील निर्देशानंतर उपमुख्यमंत्र्यांची माहिती

**मुंबई : प्रतिनिधी**

ओबीसी राजकीय आरक्षणासाठी बांठिया आयोगाने तयार केलेला अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केल्यानंतर ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत करण्यात आले, मात्र बांठिया आयोगाच्या या अहवालात त्रुटी असल्याचे आढळून आल्यानंतर या निर्णयाला स्थगिती देण्यात आली. न्यायालयाच्या याच निर्णयाबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अधिक माहिती दिली आहे.



न्यायालयाने आरक्षणासंदर्भातील याचिकांवर तत्काळ सुनावणी घेण्यास वेळ नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे आता निवडणुका होऊ शकत नाहीत, असे फडणवीस म्हणाले आहेत.

ओबीसी आरक्षणाच्या मुद्यावरून राज्यामध्ये संभ्रम निर्माण झालेला असतानाच आता पुढील पाच आठवड्यांसाठी परिस्थिती जैसे थे ठेवावी असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे आता निवडणुका होऊ शकत नाहीत, असे फडणवीस म्हणाले आहेत.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबद्दल राज्य सरकारने अधिक स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी सोमवारी (दि. २२) विधिमंडळात केली होती. त्यानंतर फडणवीस यांनी स्पष्टीकरण दिले. ओबीसी आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने जो निर्णय दिला आहे, याची माहिती मी फोनद्वारे घेतली आहे. आपण ९४ नगरपालिकांचे ओबीसी आरक्षण, तत्काळ निवडणुका लावाव्यात, तसेच न्यायालयाने दिलेल्या निर्णयाला स्थगिती द्यावी, अशा मागण्या केल्या होत्या.

यासंदर्भात तत्काळ सुनावणी घेण्यासाठी आमच्याकडे वेळ नाही, असे न्यायालयाने सांगितले आहे. याच कारणामुळे न्यायालयाने आरक्षणासंदर्भातील परिस्थिती जैसे थे ठेवण्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे आता निवडणुका होऊ शकत नाहीत. सरकारने जो अध्यादेश काढलेला आहे, त्याला न्यायालयाने स्थगिती दिलेली नाही, अशी माहिती फडणवीस यांनी दिली.

**“ सर्वोच्च न्यायालयात सर्व खटले एकत्रित करून आदेश देण्यात आला आहे. ९६ नगरपालिकांमधील ओबीसी आरक्षण, मुंबई पालिका निवडणुकीसाठी २२७ वॉर्डनिर्मिती करण्याचा घेतलेला निर्णय, तसेच काही महापालिकामधील प्रभागांच्या रचनेचा घेतलेला निर्णय, या तिन्ही निर्णयांची एकत्रित सुनावणी होती. शिंदे-फडणवीस सरकारने दिलेल्या अध्यादेशाला कोर्टाने स्थगिती दिलेली नाही.**

**-आशिष शेलार, अध्यक्ष, मुंबई भाजप**

# कोकणातील रस्त्यांची कामे पूर्ण करा

## मुंबई-गोवा महामार्ग बैठकीत मंत्री रवींद्र चव्हाण यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

गणेशोत्सव साजरा करण्यासाठी कोकणात येणार्‍या चाकरमान्यांचा प्रवास अधिक सुखकर होण्यासाठी कोकणातील रस्त्यांच्या दुरुस्तीचे कामे २५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करावीत. सध्या महामार्गावरील खड्डे भरणे आणि दुरूस्तीची कामे सुरू आहेत. ही कामे युद्धपातळीवर काम करा, अशा सूचना सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांनी बैठकीत दिल्या.



मुंबई-गोवा महामार्गाच्या दुरुस्तीसंदर्भात सोमवारी (दि. २२) बैठक झाली. या बैठकीत शालेय शिक्षण व मराठी भाषा विभाग मंत्री दीपक केसरकर, खासदार सुनील तटकरे, विनायक राऊत, आमदार प्रवीण दरेकर, भरत गोगवले, नितेश राणे, वैभव नाईक, राजन तेली, योगेश कदम, रविशेठ पाटील, शेखर निकम, किरण पावसकर, राजन साळवी, अनिकेत तटकरे, आदिती तटकरे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव (रस्ते) एस. एस. साळुंखे, सचिव (बांधकाम) पी. डी. नवघरे, मुख्य अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) संतोष शेलार, कोकण विभागाचे मुख्य अभियंता एस. एन. राजभोग, रायगडच्या वरिष्ठ अभियंता सुषमा गायकवाड, रत्नागिरीच्या वरिष्ठ अभियंता श्रीमती नाईक, रत्नागिरीचे कार्यकारी अभियंता (राष्ट्रीय महामार्ग) जाधव उपस्थित होते.

महामार्गाच्या दुरस्तीसंदर्भात उपस्थित आमदार आणि खासदारांनी सूचना केल्या असून या सूचनांचा सकारात्मक विचार करून जलदगतीने निर्णय घेऊन काम करण्याच्या सूचना चव्हाण यांनी केल्या. याच बरोबर संपूर्ण महामार्गावर वाहतूक पोलिसांच्या मदतीसाठी जास्तीत जास्त ट्राफिक वॉर्डन तैनात करून वाहतूक व्यवस्थापन सुरळीत ठेवण्याचे आदेशही वाहतूक विभागाला देण्यात आले.

रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे ज्या ज्या कंत्राटदारांकडे देण्यात आली आहे, त्यांच्या कामावर नजर ठेवण्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागातील एक अभियंता नेमून देऊन या दोघांचीही नावे शासनाच्या संकेतस्थळावर टाकण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## शिंदे गट जिल्हा संपर्क नेतेपदी शेवाळे

**पनवेल : वार्ताहर**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाने पनवेल तालुक्यामध्ये पक्षाच्या मोर्चेबांधणीचे काम हाती घेतले आहे. त्या अनुषंगाने सोमवारी (दि. २२) सचिव संजय मोरे यांनी मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पनवेल व उरण जिल्ह्याच्या मुख्य पदाधिकार्‍यांना पत्र देऊन मोर्चेबांधणीचे काम सुरू केले. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे कट्टर समर्थक रामदास शेवाळे यांची पक्षाने पनवेल जिल्हा संपर्क नेते म्हणून नियुक्ती केली आहे.



स्थानिक पातळीवर काम करणे तसेच पक्षबांधणीसाठी नवीन जबाबदार्‍यांचे वाटप करणे अशी विविध कामांची जबाबदारी शेवाळे यांच्यावर सचिव मोरे यांनी सोपविली आहे. शेवाळे यांच्यासोबत पनवेलच्या मनपा क्षेत्रासाठी अ‍ॅड. प्रथमेश सोमण यांना पदभार सोपविण्यात आला आहे. रुपेश ठोंबरे यांची तालुकाप्रमुखपदी, माजी जिल्हा परिषद सदस्य परेश पाटील यांना पनवेल ग्रामीण उपजिल्हा प्रमुखपदी, ग्रामीण पनवेलची जबाबदारी परेश पाटील यांना देण्यात आली आहे.

या वेळी मावळचे खासदार श्रीरंग बारणे, शिवसेनेचे शिंदे गटाचे सचिव संजय मोरे, आमदार महेंद्र थोरवे हे उपस्थित होते.

## कामोठ्यातील रस्ते, गटार दुरूस्त करा

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

सिडको हद्दीतील कामोठे नोडमधील रस्ते, फुटपाथ, पावसाळी गटार यांची देखभाल दुरूस्ती करा, अशी मागणी पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी सिडकोच्या कामोठे येथील कार्यकारी अभियंत्यांना निवेदन दिले आहे.

**माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांची मागणी**

भगत यांनी निवेदनात म्हटले आहे की, पनवेल महानगपालिका हद्दीतील सिडको, कामोठे नोडमधील रस्ते, फुटपाथ, गटारांची दुरूस्ती करणे व रस्त्यामधील खड्डे, पावसाळी गटारांवरील झाकणे बसविणे अत्यंत गरजेचे असून पुढील काही दिवसांत गणेशोत्सव येणार आहे. त्या दृष्टीने आपण काळजी घेणे आवश्यक आहे. या बाबत कार्यवाही करावी. यासोबतच मानसरोवर स्टेशन ते हायवे हा मुख्य रस्ता व खांदेश्वर स्टेशन ते ऐश्वर्या हॉटेल या दोन गोष्टींकडे प्रामुख्याने लक्ष द्यावे, असेही डॉ. अरुणकुमार भगत यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

## पनवेलमध्ये शास्त्रीय गायन कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय शास्त्रीय संगीत सर्वसामान्यांपर्यंत पोहचावे, यासाठी आपले आयुष्य वेचणारे संगीत ऋषी पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या १५०व्या जयंतीनिमित्त पनवेल कल्चरल असोसिएशनच्या वतीने रविवारी (दि. २१) सुप्रसिद्ध गायक तथा रायगड भूषण पंडित उमेश चौधरी आणि गायिका मधुरा सोहनी यांच्या शास्त्रीय गायनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला.

या वेळी संवादिनीवर नंदकुमार कर्वे तर तबल्यावर प्रसाद सुतार यांनी गायकांना साथ दिली. पं. विष्णू पलुस्करांनी ५ मे १९०१ रोजी लाहोर येथे गंधर्व विद्यालयाची स्थापना केली. यापूर्वी राजे रजवाड्यांच्या मदतीवरच आधारलेली अशी संगीत संस्था प्रस्थापित झालेली होती. गंधर्व महाविद्यालयाची स्थापना ही भारतात प्रथमच जनतेच्या मदतीवर चालणारी अशी संस्था निर्माण झाली. गंधर्व महाविद्यालयांतून तयार झालेल्या सुरुवातीच्या शिष्यांचे पुढे मोठे संगीतकार झाले. त्यातून संगीत शिकवणारे गुरूही निर्माण झाले. समाजातील लोकांना या विद्यालयाविषयी एक प्रकारचा आदर निर्माण झाला. संगीताचा राज दरबारातून जनतेच्या घराघरात हा प्रवास घडविण्याचे काम करणारे संगीत ऋषी पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर यांच्या जयंतीनिमित्त हा कार्यक्रम पनवेल कल्चरल असोसिएशनचे सभागृह येथे मोठ्या उत्साहात झाला असून या कार्यक्रमाला रसिकांनी भरभरून प्रतिसाद दिला.



# सीकेटी महाविद्यालयात विज्ञान संघटनेचे उद्घाटन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनी येथील चांगू काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स महाविद्यालयाच्या विज्ञान संघटनेचे उद्घाटन शनिवारी (दि. २०) करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी मुख्य मार्गदर्शक इनोव्हेशन हब, नेहरू सायन्स सेंटर व वरिष्ठ महाव्यवस्थापक आणि बीएएसएफ, आर अँड डी केंद्राचे प्रमुख डॉ. प्रबोध चोबे उपस्थित होते, तसेच प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील, विज्ञान शाखाप्रमुख डॉ. जे. एस. ठाकूर, आयक्यूएसी समन्वयक डॉ. बी. डी. आघाव व विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे उपस्थित होते.

डॉ. प्रबोध चोबे यांच्या हस्ते विज्ञान संघटनेचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी पोस्टर आणि मॉडेलची पाहणी केली. या स्पर्धेत ४४ पोस्टर आणि १८ मॉडेल ठेवण्यात आले होते आणि त्यातून प्रत्येक शाखेतून तीन क्रमांक काढण्यात आले. स्पर्धेतला भरघोस प्रतिसाद पाहून उत्तेजनार्थ क्रमांक काढण्यात आले.

यानंतर विज्ञान संघटना आणि आयक्यूएसीच्या समन्वयाने विज्ञानातील नावीन्य आणि त्याचे उपयोग या विषयावर व्याख्यान झाले. प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांनी महाविद्यालयाच्या कीर्तीचा मागोवा घेतला, तसेच विज्ञान संघटनेचे प्रमुख प्रा. जी. एस. साठे यांनी विज्ञान संघटनेच्या उपक्रमांबद्दल आढावा दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. सपना चिलाटे यांनी केले, तसेच प्रा. सत्यजित कांबळे यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.

कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.



## महिलेचा मृतदेह आढळल्याने खळबळ

**पनवेल :** रस्त्याच्या कडेला एका महिलेचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह रोडपाली, कळंबोली परिसरात आढळला.

पुरुषार्थ पेट्रोल पंप सिग्नल ते फुडलॅण्ड सिग्नलकडे जाणार्‍या रस्त्यावर एका महिलेचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला आहे. महिलेचे अंदाजे वय ३५ ते ४५ वर्षे, अंगाने मजबूत, उंची पाच फूट, चेहरा गोल, अंगात पिवळा टॉप व पिवळ्या पायजमा आहे. हातात लाल रंगाच्या दोन-दोन बांगड्या, पायात पैंजण, गळ्यात मंगळसूत्र आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास कळंबोली पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक माधव इंगळे यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## खारघरमधील पाणीपुरवठा राहणार सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोन दिवस पाणीपुरवठा बंद राहणार असल्याच्या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे व भाजप खारघर मंडल सरचिटणीस दीपक शिंदे यांनी खारघर सिडको पाणीपुरवठा सहाय्यक अभियंता राहुल सरोदे यांच्याशी संपर्क साधला. या वेळी त्यांनी बंद पाणीपुरवठ्याचा खारघर नोडवर विशेष परिणाम जाणवणार नाही, अशी माहिती दिली.

खारघर सिडको पाणीपुरवठा सहाय्यक अभियंता राहुल सरोदे यांनी दिलेल्या माहितीनुसार, २२ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता ते २३ ऑगस्ट मध्यरात्री १२ वाजेपर्यंत तब्बल ४० तास पाणीपुरवठा बंद केला जाणार आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे मुख्य फिडर जलवाहिनी बदलणे आणि मुख्य फिडर जलवाहिनीवरील दुरुस्ती करण्यासाठी पाणीपुरवठा बंद केला जाणार आहे. त्यामुळे नवीन पनवेल, काळुंद्रे, कळंबोली आणि करंजाडे नोडमधील वसाहतींना पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तसेच काम पूर्ण झाल्यानंतर दोन दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा सुरू राहणार आहे, परंतु याचा विशेष परिणाम खारघर नोडवर जाणवणार नाही.

पान १ वरून

## कर्नाळा बँक घोटाळ्यातील दोषींवर लवकरात लवकर कारवाई करणार

### लक्षवेधी सूचनेवर उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री यांनी दिलेले निवेदन

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यामार्फत कर्नाळा नागरी सहकारी बँक पनवेल या बँकेच्या ३१ मार्च २०१८अखेर केलेल्या तपासणीत ५९ कर्ज प्रकरणांमध्ये गंभीर आक्षेप निदर्शनास आल्याने त्यांनी २२ एप्रिल २०१९ रोजी या कर्ज प्रकरणाबाबत विशेष लक्ष केंद्रित करून विशेष लेखा परीक्षण करण्याकरिता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांना कळविले. त्या अनुषंगाने सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, पुणे यांनी जिल्हा विशेष लेखा परीक्षक (वर्ग १) सहकारी संस्था रायगड अलिबाग यांना कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे विशेष लेखा परीक्षण करून त्याबाबतचा अहवाल सादर करण्याबाबत सूचित केले. या लेखापरीक्षण अहवालामध्ये संबंधित आरोपींनी संगनमताने केलेल्या विनातारणी, गैरविनियोग व गैरव्यवहारामुळे बँकेचे ठेवीदार, खातेदार व सभासद यांच्या ठेवी धोक्यात आल्या असल्यामुळे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० तसेच भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा दाखल करण्याची शिफारस करण्यात आली.

या अहवालाच्या अनुषंगाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात गु.र.क्र.७८/२०२० भा. दं. वि. कलम अन्वये ४०९ ४१७, ४२०, ४६३, ४६५ ४६७, ४६८, ४७१, ४७७, १७७, २०१, १२०(२), ३४ सह सहकारी संस्था अधिनियम कलम १४७ सह महाराष्ट्र ठेवीदारांचे हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम कलम ३ प्रमाणे बँकेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक, व इतर संबंधितांवर अशा एकूण ८३ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणी आर्थिक गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत तपास करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने गुन्ह्यात आरोपी विवेक शंकर पाटील (अध्यक्ष-कर्नाळा नागरी सहकारी बँक, पनवेल) यांना २० जून २०२२ रोजी अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुद्ध मूळ दोषारोपपत्र ६ जुलै २०१२ रोजी दाखल करण्यात आले असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

या प्रकरणात एकूण ५१.६२४ ठेवीदारांची एकूण ठेव रक्कम ५५३,३२,२०,९८१ (पाचशे त्रेपन्न कोटी बत्तीस लाख वीस हजार नऊशे एक्याऐंशी) रुपयांचा अपहार झाल्याचे निदर्शनास आले आहे. सध्या या बँकेवर शासनाने सहायक निबंधक, सहकार विभाग यांची अवसायक म्हणून नेमणूक केली आहे. ही बँक अवसायनात गेल्यामुळे डीआयसीजीसी यांच्याकडून पाच लाखांच्या आतील रकमा संबंधित ठेवीदारांना रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या डिपॉजिट इन्शुरन्स स्किम १९६९नुसार ठेवीदारांचे क्लेम सेटलमेंट प्रस्ताव पाठवून त्या अंतर्गत ३१ जुलै २०२२पर्यंत एकूण १८७५६ ठेवीदारांना ३५८,९६,०६,८६० (तीनशे अठावन्न कोटी शहाण्णव लाख सहा हजार आठशे साठ) रुपये वाटप करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्था) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ कलम ४ अन्वये कर्नाळा नागरी सहकारी बँकेचे संचालक व पदाधिकारी यांच्याविरुद्ध दाखल गुन्ह्यातील आरोपी व वित्तीय संस्थेच्या एकूण सुमारे ९०,८२,९२,७२० (नव्वद कोटी ब्याऐंशी लाख ब्याण्णव हजार सातशे वीस) रुपये किमतीच्या निष्पन्न झालेल्या स्थावर जंगम मालमत्ता व बँक खाती जप्त करण्याचे शासन आदेश निर्गमित करण्यासाठी अप्पर पोलीस महासंचालक (आर्थिक गुन्हे शाखा), मुंबई यांचा प्रस्ताव गृह विभागास प्राप्त झाला आहे. महाराष्ट्र ठेवीदारांच्या (वित्तीय संस्था) हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम १९९९ अन्वये कलम ४ आणि कलम ५ अन्वये या मालमत्ता जप्त करण्यासंदर्भात व जप्त मालमत्तांवर नियंत्रण ठेवण्यासाठी सक्षम प्राधिकारी नियुक्त करण्याबाबतच्या निर्गमित करावयाच्या आदेशांचे प्रारूप विधी व न्याय विभागाकडून तपासून शासन आदेश निर्गमित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. या गुन्ह्याची व्याप्ती मोठी असून गुन्ह्यातील उर्वरित आरोपींविरुद्ध पुरावे गोळा करण्याचे काम सुरू आहे, असेही उपमुख्यमंत्री तथा वित्तमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, आम्ही आमच्या अशिलांच्या वतीने १) कांतादेवी चौधरी २) विमलकुमार चौधरी ३) रोहन चौधरी सगळे रा.अंधेरी,मुंबई यांच्या सामाईक मालकी हक्काची व ताबेकब्जातील खालील वर्णन केलेली शेतजमीन मिळकत मौजे-वाजे,तालुका- पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णाचे मिळकतीच्या शीर्षकाची तपासणी करीत आहेत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-वाजे, तालुका-पनवेल, जि.रायगड**

| सर्वे. नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| २४१/१ब | ८०.०० | १.६२ |
| २४१/१अ | १०६.७० | १.६९ |
| २४१/२(२) | ६६.०० | १२.११ |
| २२७/२ | ३८.०० | ०.७८ |
| २३४/० | ८३.७० | ११.१२ |
| २३१/० | ७९.०० | १.४४ |
| २२८/२ | ७२.०० | १.५० |
| २३७/० | ५५.२५ | १.१६ |
| २३३/० | ४०.७० | ५.१६ |
| २२८/१ | ३०.०० | ०.५७ |
| २४१/२(१) | २०.०० | १.८७ |
| २३५/० | ६२.०० | ६.७२ |
| २२७/१ | १६.०० | २.४७ |
| २३९/० | ३५.०० | ०.७५ |
| २४०/० | ४६.५० | |
| २४०/० | १५.५० | १.२५ |
| २४१/३ब | ३४.०० | ३.०० |

सदरहु मिळकतीमध्ये अन्यकोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, विकासनकरार, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा, कब्जा, इंजमेंट साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीसीच्या तारखेपासून १४ दिवसाचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर, समक्ष वा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात.याप्रमाणे विहित मुदतीत कोणत्याही हरकती दाखल न आल्यास वरील मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहेत व हरकत असल्यास ती सोडून दिली आहे असे गृहीत धरून आम्ही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतीस आमचे अशील हे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाहीत.

ठिकाण : पनवेल
दिनांक: २२/०८/२०२२

सही /-
**अँड.पल्लवी अमृत मानकर**
बी.कॉम.,एल.एल.एम.,डी.सी.एल.

**कार्यालयीन पत्ता :** शॉप नं.१, आकाशदीप बिल्डींग, ऑपो. कनक सरोवर, ठाणा नाका रोड, जुने पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड. मो. ८८३०४४८२९१





पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
मंगळवार, दि. २३ ऑगस्ट २०२२ रोजी होणारे
कोरोना प्रतिबंधक लसीकरण
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड | कोव्हॅक्सिन | कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी-१, गावदेवी पाडा, पनवेल ■ २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी-४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी-५, डी-मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी-६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ७. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल ■ ८. टाटा अ‍ॅडव्हान्स सेंटर, खारघर
- ९. आरोग्य उपकेंद्र, नावडे, कळंबोली (उपप्रभाग समिती कार्यालय, नावडे, जुना पुणे-मुंबई हायवे)

ग्रामीण लसीकरण

■ तुर्भे ■ घोट रा.जि.प. शाळा (म्हात्रे पाडा/गोंधळी पाडा/मढवी पाडा/वाघ्राची वाडी ■ वळवळी अंगणवाडी ■ पापडीचा पाडा/ ■ जुई गाव ■ इनामपुरी/पिसार्वे

ग्रामीण लसीकरण सत्रांत दि. २५.०७.२०२२ पासून तक्त्यात नमूद केलेल्या गावामध्ये पहिला, दुसरा व बुस्टर डोस लाभार्थ्यांसाठी उपलब्ध असणार आहे.

Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.

# गणेशोत्सवात नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई

## ■ सहाय्यक पोलीस आयुक्त सोनावणेंची स्पष्टोक्ती ■ मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना बैठकीत सूचना



**पनवेल : वार्ताहर**

गणेशोत्सव सण साजरा करताना शासनाने आखून दिलेल्या सर्व नियमांचे पालन करावे व नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करण्यात येईल, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त भागवत सोनावणे यांनी दिली. ते खारघर पोलीस ठाणे हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, शांतता कमिटी व सागरी सुरक्षा दलाच्या बैठकीत बोलत होते.

या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे, महिला पोलीस निरीक्षक विमल बिडवे आदी उपस्थित होते. गणेशोत्सव साजरा करताना मंडप आणि बाहेरील परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात यावेत, कोणत्याही धर्माच्या भावना दुखावतील असे आक्षेपार्ह देखावे, फलक व चित्रफिती करू नये, जबरदस्तीने वर्गणी गोळा करू नये, तसेच आस्थापनांकडून योग्य त्या परवानगी घेऊनच उत्सव साजरा करण्याच्या सूचना खारघरमधील गणेश मंडळांच्या पदाधिकार्यांना पोलिसांनी दिल्या आहेत. गणरायाच्या आगमनाला अवघे काही दिवस शिल्लक आहेत.

हा उत्सव निर्विघ्नपणे पार पडावा, म्हणून पोलिसांनीदेखील कंबर कसली आहे. याच अनुषंगाने खारघर पोलीस ठाणे हद्दीतील सार्वजनिक गणेशोत्सव पदाधिकाऱ्यांना उत्सव साजरा करताना शांततेत व खेळीमेळीच्या वातावरणात, कोणत्याही धर्माच्या भावना दुखावतील, असे आक्षेपार्ह देखावे, फलक व चित्रफिती यांसदर्भात शांतता कमिटी व सागरी सुरक्षा दलाची एक बैठक घेण्यात आली.

उत्सवासाठी जबरदस्तीने वर्गणी गोळा करू नये, सर्व प्रकारच्या आस्थापनाकडून योग्य त्या परवानगी घेऊनच उत्सव साजरे करा. तसेच गणेश उत्सव मंडपाच्या आणि बाहेर सीसीटीव्ही कॅमेर्यासोबत स्वयंसेवक नेमण्याच्या सूचनादेखील या बैठकीत करण्यात आल्या आहेत. ध्वनिप्रदूषण टाळण्याचे मंडळांना आवाहन सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे ध्वनिप्रदूषणाचा उल्लंघन केल्यास कारवाई करणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीपान शिंदे यांनी सांगितले.

श्री गणेशमूर्तीचे आगमन व विसर्जन मिरवणूक विहित वेळेत सुरू करून विहित वेळेत संपवाव्यात. कोणताही 'अनुचित प्रकार अथवा बेवारस वस्तू व व्यक्तीच्या संशयित हालचाली निदर्शनास आल्यास तत्काळ संपर्क साधण्याच्या सूचनादेखील पोलिसांनी केल्या आहेत.

## खारघर येथे सोसायटीतील गणेश मंदिराचे कलशारोहण

### आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर, हाईड पार्क सोसायटीमधील गणेश मंदिराच्या कळस रोहणाचा भव्य सोहळा पार्कच्या रहिवाश्यांनी विधीवत जल्लोषात साजरा केला. या कार्यक्रमात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती लाभली.

सकाळी पंचांग पूजन, होम हवन आणि कळस पूजन करण्यात आले आणि त्यानंतर कळस यात्रा काढण्यात आली. अग्रक्रमी ढोल–ताशानंतर कळस पालखी, पारंपरिक वेशभूषेतील रहिवाशी, भजन मंडळी, देवदेवतांच्या वेषातील बच्चे कंपनीचा चित्ररथ, महिलांच्या फुगडी, असा अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साहवर्धक दणकेबाज कार्यक्रम होता.

कळस रोहणानंतर सोसायटीने नागरिकांसाठी महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजित केला होता. जवळपास १५०० नागरिकांनी त्याचा लाभ घेतला.

या सोहळ्यास भाजप खारघर मंडल अध्यक्ष ब्रिजेश पटेल, माजी नगरसेवक हरेश केणी, युवा मोर्चा अध्यक्ष विनोद घरत, माजी नगरसेवक पापा पटेल, मंडल चिटणीस सचिन वासकर, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी यांच्यासह खारघरमधील विविध मठ–मंदीर प्रमुख तसेच राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, विश्व हिंदू परिषद, विश्वमांगल्य सभा, भारत रक्षा मंच अशा विविध संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सोसायटीने सर्व मान्यवरांचा शाल, श्रीफळ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला.

# मुंबई अनुव्रत समितीचा पनवेलमध्ये संघटन दौरा

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची उपस्थिती



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मुंबई अनुव्रत समितीतर्फे रायगड विभागाच्या प्रचार प्रवासाचा संघटन दौऱ्याचा कार्यक्रम मुंबई अध्यक्ष कांचन सोनी, मंत्री वनिता बाफना यांच्या अध्यक्षतेखाली पनवेलमधील तेरापंथ भवन रविवारी (दि. २१) झाला. या कार्यक्रमाला महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवांतर्गत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून, रायगडच्या सर्व भागातून पहिल्या टप्प्यात निवडलेल्या ३० मुलांचा अंतिम कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी अंतिम विजेते ठरलेल्या विजेत्यांना न्यायाधीश अधिवक्ता शिवानी कोठारी, शिक्षिका संगीता कोठारी यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या वेळी मुंबई महिला मंडळ मंत्री अलका मेहता, मंत्री वनिता बाफना, रोटरीच्या डॉ. स्वाती लिखे, उपासिका शारदा मेहता, मुंबई उपाध्यक्ष डॉ. विजयसिंग संचेती, तारादेवी चौधरी, मूर्तिपूजक समाजाचे प्रमुख मोतीलाल जैन, रायगडचे संयोजक राजेश मेहता, सहमंत्री प्रियंका सिंघवी, मंजु संचेती, विद्याजी सोनी, मुंबई सभेचे सहमंत्री राजेंद्र रांका, खारघर सभेचे अध्यक्ष सुरेश पटवारी, मंत्री कुंदन मेहता, टीयूपीचे अध्यक्ष शैलेंद्र सोनी, मंत्री शैलेंद्र पटवारी, रवी बाफना, अंकित चौधरी आदी उपस्थित होते.

महिला मंडळ समन्वयक टीना संचेती, ज्येष्ठ श्रावक लक्ष्मीलाल चंडालिया, अशोक चंडालिया, पद्मजी चोरडिया, पन्नालाल बाफना, संजय जैन, ललिता बंब, संगीता कोठारी, भारती बाफना, सरिता धर्मावत, जयेश समर, कमलेश बाफना, दीपा पटवारी, जिग्नेश हिरण, भेरू सोनवणे, कोठरी, कोठरी, दीपेश हिरन, पवन दुग्गड, प्रमिला डांगी यांचे सहकार्य लाभले. स्वागत राजेश मेहता, सुत्रसंचालन सीमा बाबेल यांनी, तर उपस्थितांचे आभार दीपा पटवारी यांनी मानले.

## कामोठ्यात अवघ्या दहा रुपयांत इडली

### परेश ठाकूर यांच्या हस्ते हॉटेलचे उद्घाटन

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

कामोठे सेक्टर २१ येथे नव्याने नादब्रम्ह इडली हे हॉटेल सुरू झाले आहे. हे हॉटेल प्रतिक शिंदे व प्रेम शिंदे यांनी सुरू केले असून या नादभ्रम्ह इडली या हॉटेलचे पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते रविवारी (दि. २१) उद्घाटन झाले. या ठिकाणी अवघ्या १० रुपयांमध्ये इडली मिळणार असून या नवीन व्यवसायाला परेश ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या तसेच पुढील यशस्वी वाटचालीसाठी सदीच्छा व्यक्त केल्या.

कामोठे वसाहतीमध्ये नागरीकरण मोठ्या प्रमाणात झाले असून या ठिकाणी अनेक उद्योग नव्याने सुरू होत आहे. त्यानुसार प्रतिक शिंदे व प्रेम शिंदे यांनी अवघ्या दहा रुपयांमध्ये इडली अशी सर्वसामान्य नागरिकांना परवडणारे नादब्रम्ह इडली हा व्यवसाय नव्याने सुरू केला आहे. या हॉटेलचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते प्रदीप भगत, भाजप युवा मोर्चा उपाध्यक्ष नितेश भुगे आदी उपस्थित होते.





**पनवेल : भाजप पळस्पे युवा मोर्चाचे मयूर पाटील यांनी वाढदिवसानिमित्त सोमवारी भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांचे आशीर्वाद घेतले. सोबत पुरुषोत्तम पवार, शिरढोणचे जयेश भोपी तसेच स्वागत टकले.**



**पनवेल : नवी मुंबई परिसरातील सुप्रसिद्ध असे हॉटेल भगत ताराचंद हे पनवेलमध्ये नव्याने सुरू झाले आहे. मनीष चावला आणि पंकज चावला यांनी हे हॉटेल सुरु केले असून या ठिकाणी महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट देत शुभेच्छा दिल्या.**

## कळंबोलीतील धोकादायक ड्रेनेजची झाकणे बदलली

### स्त्री शक्ती फाउंडेशनचा पाठपुरावा



**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली सेक्टर ५ येथील धोकादायक झालेल्या ड्रेनेजची झाकणे बदलण्यात आली आहेत. याकामी स्त्री शक्ती फाउंडेशनने पाठपुरावा केला होता.

पंधरा दिवसांपुर्वी मच्छिमार्केट सेक्टर ५ येथे जेव्हा एक गायीचे पाय त्या चेंबरमध्ये अडकला होता, तेव्हा दत्ता ठाकूर यांनी ही बाब तसेच मच्छिमार्केटच्या आसपासच्या चेंबर वरची तुटलेली झाकणे स्त्री शक्ती फाउंडेशनच्या अध्यक्ष विजया कदम यांच्या निदर्शनास आणुन दिली.

कदम यांनी तत्काळ संबंधित सिडको अधिकारी श्री. बनकर यांना धोकादायक चेंबरची बाब लक्षात आणून दिली. तेव्हा त्यांनी १५ ऑगस्टनंतर कामाला सुरुवात करू असे सांगितले. त्यानंतर त्यांनी सिडको अभयंता श्री. सुबोध यांच्यासह कर्मचाऱ्यांसोबत उभे राहून सर्व झाकणे बदलुन घेतली. दरम्यान, महापालिकेकडूनही अरुण कांबळे यांनी नाले साफसफाई करण्यास सुरुवात केली आहे.

## खांदा कॉलनीत कॅन्सर चिकित्सा शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खांदा कॉलनीत नव्याने सुरू झालेल्या ओन्कोकेएर सेंटर यांच्या माध्यमातून पनवेल तालुका भंडारी समाजाचे एक दिवसीय कॅन्सर चिकीत्सा शिबिराचे आयोजन रविवारी (दि. २१) करण्यात आले.

या शिबिराला पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांच्यासोबत भंडारी समाजाचे मान्यवर नेते उपस्थित होते. या वेळी ओन्केकेएर सेंटरचे मुख्य डॉ. देवेंद्र पाल यांनी केएर सेन्टरची माहिती दिली. कॅन्सरच्या शेवटच्या टप्प्यात उपचार होण्याअगोदर प्राथमिक स्टेजमध्ये त्यांवर उपचार झाले तर कॅन्सर बरा होऊ शकतो. त्यामुळे या केअर सेंटरमध्ये प्राथमिक उपचार होऊ शकतात अशी माहिती त्यांनी दिली. त्यांचा रूग्णांनी लाभ घ्यावा, असे आवाहनही केले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी पनवेल तालुका भंडारी समाजाचे अध्यक्ष डॉ. दीपक खोत, सेक्रेटरी रत्नराज महाडिक, विनायक शिवलकर, मिलिंद नरसे, परेश शेटे, शिरीष केळेसकर, राजेश कनगुटकर, प्रणिता कदम, महेंद्र दुधवडकर आदींनी मेहनत घेतली.



## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात व्याख्यान



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व शास्त्र सोमवारी (दि.२२) रसायनशास्त्र विभागातर्फे 'अणुशक्ती' विभागामध्ये असणाऱ्या विविध करिअर संधी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले.

व्याख्यानासाठी अणू ऊर्जा विभागाचे डेव्ही वॉटर बोर्डचे माजी चेअरमन व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. ए. एन वर्मा हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. या व्याख्यानामधे विद्यार्थ्यांना भाभा अणूशक्ती केंद्रामध्ये असणाऱ्या विविध करिअर संधीची माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या असलेल्या शंकाचे निरसन केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना सध्याच्या युगात असलेले अणुशक्तीचे महत्त्व समजावून सांगितले. या वेळी विज्ञान शाखेतील सुमारे ४२ विद्यार्थी उपस्थित होते. तसेच सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आयोजन रसायनशास्त्र विभागप्रमुख प्रा. महेश्वरी झिरपे यांनी केले. तसेच निलम लोहकरे, प्रा. रूपाली नागरेकर व डॉ. दीपीका हसीजा यांनी सहकार्य केले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर तसेच आमदार प्रशांत ठाकूर, संस्थेचे उपाध्यक्ष अरूणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख व सचिव डॉ. एस. टी. गडदे यांनी आयोजकांचे कौतुक केले.

## सीकेटी विद्यालयात एनएसएसमार्फत व्याख्यानमाला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त राष्ट्रीय सेवा योजने (एनएसएस) अंतर्गत व्याख्यानमाला (पुष्प पहिले) या उपक्रमाचे आयोजन सोमवारी (दि. २२) करण्यात आले.



भारतीय लष्करात २८ वर्ष सेवा बजावलेले प्रमुख व्याख्याते सुभेदार प्रभाकर पाटील, १९ वर्ष सेवा बजावलेले हवालदार सुनील पाटील तसेच विजय आर्मी स्कूलचे उपप्राचार्य एस. पी. पाटील यांनी लष्करातील सेवा संधी आणि लष्करातील प्रत्यक्ष अनुभवया विषयांवर उपस्थितांना अतिशय उत्कृष्ट मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यान पर मार्गदर्शनात त्यांनी नौदल भूदल आणि हवाई दल या लष्कराच्या तीन घटकांची माहिती दिली. तसेच आर्मी रैंक कशी ठरविली जाते, सैनिकांची कार्यपद्धती कशी असते, सैनिकांची प्रशासकीय कामे, आर्मी स्कूल बद्दल माहिती, मुलांसाठी आर्मी क्षेत्रातील नोकरीच्या संधी, मुलींसाठी आर्मी क्षेत्रातील नर्स, डॉक्टर, शिक्षण क्षेत्र, बॉर्डर सिक्युरिटी पोलीस, अशा विविध संधींची त्यांनी सविस्तर माहिती दिली. त्याचबरोबर त्यांनी भारत सरकारच्या अग्नीवीरया आर्मी क्षेत्रातील योजनेचे लाभ, निवृत्तीनंतर मिळणाऱ्या विविध संधी, यांची माहिती दिली.

व्याख्यानमालेच्या शेवटी विज्ञान विभागाचे पर्यवेक्षक प्रशांत मोरे यांनी मुलींच्या आर्मी क्षेत्रातील संधी विषयी मार्गदर्शन केले. सदर व्याख्यानासाठी कला व वाणिज्य विभागाचे पर्यवेक्षक अजित सोनवणे, एन. एस. एस. युनिटचे कार्यक्रम अधिकारी विवेक पाटील, गणेश पाटील, संगीता देशमुख, तसेच विद्यार्थी, शिक्षक वृंद व शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. बारावी कला शाखेतील ध्वनी सावंत या विद्यार्थिनीने या कार्यक्रमाचे उत्कृष्ट निवेदन केले, तसेच श्रवण कदम या विद्यार्थ्यांने उपस्थितांचे आभार मानले.

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : ३३

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सअॅप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).

**१. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**

***अ.*** टाटा एलेक्सी ***आ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)

***इ.*** टाटा टेलिसर्व्हिसेस लिमिटेड ***ई.*** टाटा सन्स लिमिटेड

**२. पुढीलपैकी कोणती एक बँक सार्वजनिक क्षेत्रातील म्हणजे सरकारी आहे?**

***अ.*** एक्सिस बँक ***आ.*** आयडीबीआय बँक

***इ.*** बंधन बँक ***ई.*** इंडिया ओव्हरसीज बँक

**३. शेअर बाजाराच्या निफ्टी इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**

***अ.*** १० ***आ.*** ३०

***इ.*** ५० ***ई.*** १००

Save More - Get Pure
E-store India
India's Widest SWADESHI Supermarket
India's Next Retail Revolution
BEST PRICE SUPERMARKET
ASSURED MINIMUM 4% OFF ON ALL PRODUCTS
UPTO 33% OFF
Sai Sarang Co-op Society, Shop No.1&2, Momin Pada, Tapal Naka,Old Panvel, Pin - 410 206.

**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# पोटशूळ कशासाठी?

**दहीहंडी खेळाला साहसी क्रीडा प्रकार म्हणून मान्यता देण्याच्या निर्णयाची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अधिवेशनादरम्यान केली. त्याला कुणाचाच काही आक्षेप असण्याचे कारण नाही. परंतु या घोषणेसोबतच शिंदे यांनी गोविंदांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण देण्याचा निर्णयही जाहीर केला. राखीव जागांच्या या निर्णयाबाबत गैरसमज पसरवून त्याविरोधात टीकेची झोड उठवण्याचे राजकारण आता विरोधकांकडून खेळले जात आहे.**

दहीहंडी हा खेळ कृष्णजन्माष्टमी या हिंदु सणाच्या निमित्ताने खेळला जात असला तरी या खेळाकडे गेली अनेक वर्षे तत्सम सामुहिक खेळ खेळणारे परदेशातील खेळाडूही कौतुकाने पाहात आले आहेत. विशेषत: स्पेन, चीन आदी देशांमध्ये 'पिरॅमिड' नावाने सामुहिक क्रीडा प्रकार खेळला जातो. या विदेशी खेळाडूंनी मुंबईत येऊन गोविंदांच्या सरावात व नियोजनात रस दाखवल्यापासून या खेळाला क्रीडा प्रकार म्हणून मान्यता मिळायला हवी अशी मागणी होत होती. परंतु इतक्या वर्षांत कुठल्याही सरकारला त्या दिशेने निर्णय घेण्याचे सुचले नव्हते. बहुतांश गोविंदा हे मुंबई, ठाणे, नवी मुंबई परिसरातील कनिष्ठ मध्यमवर्गीय मराठी कुटुंबातील असतात. या समाजगटावर मतांसाठी विसंबून राहणाऱ्या शिवसेनेला तर सत्तेवर आल्यानंतरही गोविंदांसाठी काही करायचे सुचले नव्हते. परंतु शिंदे-फडणवीस सरकारने मात्र हा साहसी खेळ खेळणाऱ्या गोविंदांकडे सर्वार्थाने सहानुभूतीने पाहिले. अपघातग्रस्त झाल्यास त्यांना उपचार खर्च, विम्याचे संरक्षण आदी सुविधा देण्याचा विचारही शिंदे-फडणवीस सरकारनेच केला. या निर्णयामागे निव्वळ या कनिष्ठ मध्यमवर्गीय साहसी तरुणांविषयीचा सहानुभूतीचा दृष्टिकोनच होता. या खेळाला साहसी क्रीडा प्रकार म्हणून मान्यता मिळाल्यास प्रो-गोविंदासारख्या स्पर्धा आयोजित होऊन या तरुणांना त्यातून आर्थिक हातभार लागू शकेल अशी भावना त्यामागे होती. या सहानुभूतीच्या दृष्टिकोनाविषयी कुणालाच काही आक्षेप असण्याचे कारण नाही. वास्तविक हिंदु सणातील या साहसी खेळाला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून देण्याचा प्रामाणिक हेतूच राज्य सरकारच्या यासंदर्भातील सर्व घोषणांमागे होता. त्याचा विरोधकांनी असा राजकारणासाठी वापर करणे अनाकलनीय आहे. गोविंदांसाठीचे आरक्षण चोवीस तासात लागू होईल, गोविंदांना सरकारी नोकऱ्यांमध्ये आरक्षण दिल्यामुळे एमपीएससीसारख्या स्पर्धा परीक्षांच्या उमेदवारांवर अन्याय होईल यांसारखे गैरसमज पसरवण्याचे काम विरोधकांकडून करण्यात आले. वास्तविक गोविंदांना कोणतेही वेगळे आरक्षण दिले जाणार नसून खेळाच्या कोट्यातीलच आरक्षण देण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लागलीच स्पष्ट केले. तरीही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संबंधित घोषणांविषयी समाजात गैरसमज पसरविण्यात विरोधीपक्षांना काही प्रमाणात यश मिळाले आहे. त्यामुळे क्रीडा क्षेत्राकडूनही आरक्षणाच्या या घोषणेबद्दल नाराजी व्यक्त झाली. वास्तविक राज्यात आधीच खेळासाठी आरक्षणाचा कायदा आहे. खेळासाठीचे हे पाच टक्के आरक्षण सगळ्या जातींना लागू आहे. त्यामध्ये आधी जे खेळ होते, त्यात गोविंदा हा आणखी एक खेळ जोडण्यात आला आहे. त्यास कोणतेही अधिकचे आरक्षण दिलेले नाही असा खुलासा भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील यांनीही केला. परंतु विरोधकांनी समाजाची दिशाभूल करण्याचे आपले काम सुरूच ठेवले आहे. वास्तविक दहीहंडी या खेळाची अद्याप संघटनाही नाही. या खेळाचे स्वरुप, नियम याबाबतीत सारीच माहिती कागदोपत्री नोंदवून संबंधित नियमावली आदी आखणी करावी लागेल. परंतु नोकऱ्यांचा प्रश्न नाजुक असल्याने मुख्यमंत्र्यांच्या घोषणेवरून राजकारणाचा खेळ करण्याची संधी मात्र विरोधकांना आयती सापडली आहे.

# संगीत कलेचे शिल्पकार पं. उमेश चौधरी

आपल्या महाराष्ट्राला सांस्कृतिक वरदान लाभलेले आहे. जीवनाच्या विविध क्षेत्रात येथील प्रज्ञावंतांनी कर्तृत्त्वाची उत्तुंग शिखरे गाठली आहेत. अफाट सौंदर्याने भरलेले निसर्ग राज्याला लाभले आहे, तसेच गंधर्वाच्या गोड गळ्यातील स्वरश्रीदेखील इथल्या गायक कलावंताना निसर्गत:च लाभली आहे. त्यातून असाच एक स्वरप्रेमी वारकरी सांप्रदयाची पताका, शास्त्रीय संगीताचा वारसा सांभाळत समाजकार्य करता करता सांगितिक वाटचाल करणारे संगीत सुरमयी व्यक्तिमत्व म्हणजे पनवेल तालुक्यातील रांजणपाडा येथील संगीत विशारद रायगडभूषण पं. उमेश चौधरी.





शिक्षणात पदवीधर, अखिल भारतीय गांधर्व महाविद्यालयाची 'विशारद' पदवी, घेऊन पूर्ण केले. आकाशवाणीची बी हाय ग्रेड, पनवेल तालुका सांस्कृतिक सेलचे अध्यक्ष, रायगडभूषण, रायगड गौरव अशा अनेक मानसन्मान आणि पुरस्कारांनी त्यांचा मान्यवरांच्या हस्ते यथोचित गौरव झाला आहे. संगीत म्हणजे प्रेम, संगीत म्हणजे शांती, संगीत म्हणजे एकाग्रता असल्याने जीवनात संगीत कलेला अधिक महत्व ते देतात. त्यामुळे संगीत या विषयाकरिता एक आंतरराष्ट्रीय गुरुकुल असावा आणि 'सवाई गंधर्व' महोत्सवाइतका मोठा सांगितीक महोत्सव जो भारतात तसे परदेशात सुध्दा प्रसिध्द आहे असा महोत्सव लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नावाने सुरु व्हावा, अशी पंडित उमेश चौधरी यांची मनोमन ईच्छा असून ती त्यांच्या जीवनातील आणि संगीत क्षेत्राच्या दृष्टीने मोठी उपलब्धी असेल आणि तो मानस घेऊन ते काम करताना अधोरेखित होत आहेत.

संगीत कला ही परिवर्तनशील कला. या क्षेत्रातल्या महान साधकांनी आपापल्या क्षमतेनुसार संगीत कलेच्या उत्कर्षासाठी कायम स्वत:ला अर्पण केले. अशा वैशिष्यपूर्ण कार्यामुळेच भावीपिढीला या कलेच्या प्राचीन रचनांचा अनमोल ठेवा उपलब्ध झाला. संगीत कलेच्या शास्त्रसिद्धांतानुसार संगीत कलेचे सौदर्यत्व लिहून ठेवण्याचा प्रकार नक्कीच नाही तर त्यासाठी गुरुजनांचे मार्गदर्शन आवश्यकच. घराणेदार गायकीच्या रचना सादर करण्याची क्षमता असलेल्या गायक व संगीत शास्त्र सिद्धांतानुसार गुरुच्या मार्गदर्शनानुसार घराणेदार रचना पुनर्गठीत करून सादरीकरणाची भव्यता वाढविण्याचा प्रयत्न करून संगीत-सांस्कृतिक समाजातल्या युवा पिढीला उपलब्ध करून देणे म्हणजेच खऱ्या अर्थाने संगीत कलेचा उत्कर्षच म्हणावा लागेल, त्यामुळे रागदारी संगीत कलेला पुनःरूप नवजीवन प्राप्त होईल. अशा प्रयत्नांशिवाय संगीत कला म्हणजे संगीत कलेचा ऱ्हासच समजावा लागेल. सौंदर्यशास्त्र तत्व गठीत शास्त्रीय संगीत कलेच्या प्राचीन रचनांना पुनर्गठित करून रागदारी संगीताचा समाजासाठी उपलब्ध करून देण्याचा अथक प्रयत्न करून देणाऱ्या प्रतिभावंत गायकांमधील एक गायक मी जवळून पाहिले, ते म्हणजे उमेश चौधरी. आग्रा, जयपूर-अत्रौली घराण्याचे वारसाहक्काने प्रतिनिधी, रायगड-नवी मुंबईतील सुप्रसिद्ध शास्त्रीय गायक व भजन गायक पं. उमेश निवृत्तीबुवा चौधरी यांच्या दमदार गायन शैलीने रसिकांना नेहमीच मोहित केले आहे. मुळातच संगीताचे बाळकडू घरातून मिळाल्यामुळे संगीत आणि त्यांचे नाते भजनसम्राट निवृत्तीबुवा चौधरी आणि रसिकांच्या तसेच गुरुजनांच्या आशिर्वादाने वृद्धींगत झाले. शिक्षणात रसायनशास्त्राचे पदवीधर, त्यामुळे एका केमिकल फॅक्टरीत नोकरी, घर-संसारात मग्न असणारा माणूस वयाच्या तीशीपर्यंत इतरांप्रमाणे जीवनमान करीत होते. पण अंतर्मनात त्यांना कुठेतरी वाटत होते की गाणे यायला पाहिजे. अशातच ते २००३मध्ये चेंबूर येथील अल्लादिया खाँसाहेब स्मृती समारोहात गाणे ऐकण्याकरीता गेले असता त्या समारोहात उस्ताद अस्लम हुसैन खान यांच्या गायनाने ते भारावून गेले. त्या गाण्याची त्यांच्यावर इतकी छाप पडली की, त्यांनी त्यांचे शिष्यत्व स्विकारले आणि इथूनच त्यांचा गानप्रवास सुरू झाला. पुढे नोकरी सांभाळून घर आणि गाणे सोपे नव्हते म्हणून त्यांनी नोकरीला पूर्णविराम दिला. बिझनेस करुया म्हणजे गाण्याला वेळ मिळेल असा एक प्रयत्नही त्यांनी केला. पण सिव्हिल कंत्राट आणि गाणे ही सांगड बसेना आणि पुन्हा तारांबळ सुरूच राहिली. ही कसरत सुरू असताना एका कलाकाराला व्यासपीठ किती महत्त्वाचे आणि ते मिळविण्यासाठी त्यांनी किती धडपड केली किती खस्ता खाल्ल्या त्यांनाच ठाऊक. नवीन कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांना व्यासपीठ मिळावे, या हेतूने त्यांनी घरीच मासिक संगीत सभा सुरू केली. पुढे या त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ही संगीत सभा श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सभागृहात घेऊन पं. उमेश चौधरी यांच्या संगीत कार्याला प्रोत्साहन दिले. त्याचबरोबर पं. उमेश चौधरी यांना पनवेल तालुका सांस्कृतिक सेलच्या अध्यक्ष पदाची जबाबदारी दिली. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या माध्यमातून १९२ तासांचे अखंड भजन महोत्सव पार पडले आणि या महोत्सवाची नोंद लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंदीत होऊन विश्वविक्रम प्रस्थापित झाले. यामध्ये पं. उमेश चौधरी यांची मेहनत अधोरेखित झाली.

संगीत हे एक समाजसेवेचे माध्यम मानून संगीतातून जनजागृतीचा कायम वसा जोपासला आहे. त्यांनी संगीत माध्यमातून समाजामध्ये अवयव दानाचे महत्व पटवून देण्याचे काम त्यांनी सातत्याने केले आहे. या संगीत कलेमार्फत सर्व आजारांवर उपचार पद्धती कशाप्रकारे फायदेशीर असते, यासाठी 'म्युझिक थेरपी' सारखे उपक्रमही त्यांनी राबविले आहेत. योगियांचा देव ही भजन मालिका सह्याद्री दुरचित्रवाहिनीवरून प्रसारित झाली. त्यामध्ये शिर्षक गीताचे पार्श्वगायन त्यांनी करून संयोजक व आयोजक ही भूमिका यशस्वीपणे पार पाडत महाराष्ट्रातील अनेक कलाकारांना व्यासपीठ मिळून दिले. आजपर्यंत या वीस वर्षाच्या संगीत साधनेच्या कालावधीत उमेश चौधरी यांनी आपल्या अथक साधनेने गायन कलेवर प्रभुत्व निर्माण केले. त्याचवेळी त्यांना हे पण जाणवले की संगीत समाजातल्या युवावर्गाला ही कला अवगत करून घेण्याचा प्रचंड ओढा आहे. असंख्य संगीतवर्ग व परीक्षा प्रमाणपत्र देणाऱ्या असंख्य संगीत शिक्षण संस्था भारतात कार्यरत आहेत. पण या प्रशिक्षित गायक-वादक विद्यार्थ्यात प्रभावी सादरीकरण करण्याचा गुणधर्माचा अभाव आढळतो याला कारण म्हणजे जिथे संगीत कला, सादरीकरण प्रगल्भता साध्य होण्याआधी कमीत-कमी दहा वर्षांचा कालावधी आवश्यकच तिथे विद्यालयीन संगीत पाच ते सा वर्षातच लेखी, प्रात्यक्षिक सादरीकरण कौश्यल्यासहीत ५० ते ६० रांगामध्येच प्रमाणपत्र मिळून जाते. यास्तव विद्यार्थ्यांना अल्पशा संगीत ज्ञानावर संतुष्ट राहावे लागते आणि ही संगीत कला शिक्षण पद्धतीची ही वस्तुस्थिती आहे. पण यातूनही जे संगीत कलेच्या सादरीकरण्याच्या निपुणतेच्या शोधात असतात, अशा विद्यार्थ्यांना उमेश चौधरींच्या रागदारी संगीताच्या सौंदर्यशास्त्र गठीत रचना एकमेक मार्गदर्शक ठरतील, संगीत साधना करता करता समाजाने त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले. मात्र या कलाकाराने कधीही कुठेही बडेजाव केल्याचा आपण पाहिले नाही. उलट 'ग्रासरूट' वर राहून या कलाकाराने तळागाळात संगीत सेवा वृद्धींगत करण्याचा प्रामाणिक प्रयत्न सुरूच ठेवला आहे. त्यामुळे अशा या समाजोपयोगी गुणी कलाकाराला निरोगी दिर्घायुष्य लाभो! हीच त्यांना वाढदिवसानिमित्त संगीतमय शुभेच्छा.

**-उस्ताद अजीम खान (मुंबई)**



## बदलते तंत्रज्ञान

# फेसबूक, इन्स्टाग्राम भाषा बदलण्यासाठी 'या' स्टेप्स


फेसबूक आणि इन्स्टाग्राम हे मेटा अंतर्गत येणारे लोकप्रिय सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहेत. यांना वापरकर्त्यांची सर्वाधिक पसंती आहे. दररोज वेगवेगळ्या प्रकारची माहिती, अनेक प्रकारचे आशय, जगभरातील विविध संस्कृतींबद्दलची माहिती असे बरच काही या दोन्ही अ‍ॅप्सवर शेअर केले जाते. त्यातच वापरकर्त्यांना अधिक आकर्षित करण्यासाठी मेटाद्वारे सतत नवनवे फिचर्स आणले जातात. फेसबुक आणि इन्स्टाग्राम हे दोन्ही अप्स इंग्रजी भाषेत वापरले जातात. कारण जेव्हा आपण नवे अकाउंट सुरू करतो, तेव्हा डिफॉल्टमध्ये इंग्रजी भाषा सेट असते. यामुळे इंग्रजी न येणाऱ्यांना थोडी अडचण येते. ही अडचण दूर करण्याचा सोपा उपाय आहे, तो म्हणजे कंपनीकडून वापरकर्त्यांना त्यांची आवडती भाषा निवडण्याचा पर्याय आधीच देण्यात आला आहे.



हा भाषा बदलण्याचा पर्याय कंपनीकडून देण्यात आला आहे हे बऱ्याच जणांना माहित नसते. त्यामुळे सर्वजण फक्त इंग्रजीमध्येच हे अ‍ॅप्स वापरतात. या अ‍ॅप्समधील भाषा कशी बदलायची जाणून घ्या. फेसबूकमध्ये भाषा बदलण्याच्या पुढील स्टेप्स आहेत. सर्वात आधी तुमच्या स्मार्टफोनमध्ये फेसबुक अ‍ॅप उघडा. त्यानंतर उजव्या बाजूला सर्वात वर तीन आडव्या रेषा दिसतील, त्यावर क्लिक करून मेन्यूमध्ये जा. त्यानंतर मेन्यूमध्ये तुम्हाला शेवटी सेटिंग्स अ‍ॅंड प्रायव्हसी हा पर्याय निवडा. त्यात पुन्हा सेटिंग्स पर्याय निवडा. त्यानंतर प्रेफरन्स पर्याय निवडा. तिथे लॅंग्वेज अ‍ॅंड रीजन या पर्यायावर क्लिक करा आणि त्यातील पहिला पर्याय निवडा. त्यानंतर तिथे भाषांची यादी दिसेल, त्यातील तुमची आवडती भाषा निवडा आणि सेव्ह पर्यायावर क्लिक करा. इन्स्टाग्राममध्ये भाषा बदलण्याच्या स्टेप्स या प्रमाणे- स्मार्टफोनमध्ये इन्स्टाग्राम अ‍ॅप उघडा. त्यानंतर उजव्या बाजूला सर्वात खाली प्रोफाईल आयकॉनवर क्लिक करा. त्यामध्ये दिसणाऱ्या मेन्यू आयकॉनवर क्लिक करा. आता सेटिंग्स पर्याय निवडून अकाउंट पर्यायावर क्लिक करा. यामध्ये लॅंग्वेज हा पर्याय निवडा, त्यामध्ये अनेक भाषांची यादी दिसेल. त्यातील तुमची आवडती भाषा निवडा. अशाप्रकारे या स्टेप्स वापरून तुम्ही इन्स्टाग्राम तुमच्या भाषेत वापरू शकता.

# ज्येष्ठ साहित्यिक विंदा करंदीकर

विंदा करंदीकर यांचे पूर्ण नाव गोविंद विनायक करंदीकर आहे. ते मराठीतील कवी, लेखक, अनुवादक, व समीक्षक होते. देशाच्या साहित्य क्षेत्रातला सर्वोच्च प्रतिष्ठेचा एकोणचाळीसावा ज्ञानपीठ पुरस्कार त्यांना 'अष्टदर्शने' या साहित्यकृतीसाठी प्रदान करण्यात आला. वि. स. खांडेकर आणि कुसुमाग्रजांनंतर हा पुरस्कार मिळविणारे ते तिसरे मराठी साहित्यिक होते. याशिवाय करंदीकरांना महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार, कुसुमाग्रज पुरस्कार, कबीर सन्मान, जनस्थान पुरस्कार सारखे अनेक सन्मान व पुरस्कार देण्यात आले. त्यांच्या एकूणच कार्याचा घेतलेला हा छोटासा आढावा.



विंदा करंदीकर यांचा जन्म २३ ऑगस्ट १९१८ रोजी महाराष्ट्रातील सध्याच्या सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुक्यातील धाळवली गावात झाला. विंदांचे वडील विनायक करंदीकर हे कोकणातील पोंभुर्ले येथे होते. विंदांनी आपले शिक्षण कोल्हापुरात पूर्ण केले. 'हैदराबाद मुक्ती संग्रामात' भाग घेतला आणि त्यासाठी तुरुंगवास भोगला. करंदीकर हे कोकणच्या आर्थिक मागासलेपणाबद्दल ते संवेदनशील होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ते मार्क्सवाद असा त्यांचा वैचारिक प्रवास सुरूच होता, पण ते अशा कोणत्याही संघटनेचे सदस्य झाले नाहीत.

उदरनिर्वाहासाठी त्यांनी शिक्षण स्वीकारले. ते बसवेश्वर कॉलेज, रत्नागिरी, रामनारायण रुईया कॉलेज, मुंबई, एसआयईएस कॉलेजमध्ये इंग्रजीचे प्राध्यापक होते. त्यांनी केवळ लेखनासाठी १९७६मध्ये व्यावसायिक तर १९८१मध्ये ते स्वेच्छेने निवृत्ती स्वीकारली. विंदांचे वैयक्तिक जीवन साधे आणि स्वावलंबी राहिले. त्यांना मिळणारा स्वातंत्र्यसैनिकाचा पगार त्यांनी कधीच स्वीकारला नाही. त्यांची भूमिका नेहमीच तपस्याची राहिली आहे. विंदा करंदीकर यांच्या पत्नी सुमा करंदीकर या लेखिका होत्या. त्यांना एक मुलगी आणि दोन मुले आहेत.

विंदा करंदीकर यांचे १४ मार्च २०१०रोजी वयाच्या ९१ व्या वर्षी मुंबईत अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांना २००६मध्ये ३९ वा ज्ञानपीठ पुरस्कार प्रदान करण्यात आला, जो भारतातील सर्वोच्च साहित्य पुरस्कार आहे. विष्णू सखाराम खांडेकर (१९७४) आणि विष्णु वामन शिरवाडकर (कुसुमाग्रज) (१९८७) नंतर ज्ञानपीठ पुरस्कार जिंकणारे ते तिसरे मराठी लेखक होते. करंदीकर यांना त्यांच्या साहित्यिक कार्यासाठी केशवसुत पुरस्कार, सोव्हिएत लॅंड नेहरू साहित्य पुरस्कार, कबीर सन्मान आणि १९९६ मध्ये साहित्य अकादमी फेलोशिप यासह इतर काही पुरस्कार मिळाले. विंदा करंदीकर याचे साहित्य या प्रमाणे- काव्यसंग्रह धृपद (१९५९), जातक (१९६८), विरूपिका (१९८१), अष्टदर्शने (२००३), स्वेदगंगा (१९४९), मृदगंध (१९५४). बालकविता संग्रह- अजबखाना (१९७४), पिशीमावशी आणि तिची भुतावळ (१९८१), अडम तडम (१९८५), बागुलबोवा (१९९३) एकदा काय झाले (१९६१), राणीची बाग (१९६१), ए टू लोकांचा देश (१९६३), सर्कसवाला (१९७५), टॉप (१९९३), सशाचे कान (१९६३) परी गं परी (१९६५), सात एके सात (१९९३), ललित निबंध-आकाशाचा अर्थ (१९६५). करंदीकरांचे समग्र लघुनिबंध (१९९६), स्पर्शाची पालवी (१९५८), समीक्षा-उद्गार(१९९६), परंपरा आणि नवता (१९६७). दरम्यान विंदांनी मराठी काव्यमंजुषेत विविध घाटाच्या रंजक व वैचारिक काव्यलेखनाची भर घातली, मराठी बालकवितेची मुहूर्तमेढ रोवली. विंदा, मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट या ज्येष्ठ कवित्रियींनी संपूर्ण महाराष्ट्रात एकत्रित काव्यवाचनाचे असंख्य कार्यक्रम केले.




**खंडाळा : ऐन श्रावणातही दमदार पाऊस पडत असल्याने पर्यटनस्थळी गर्दी होऊ लागली आहे.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

# अशक्तपणा जाणवतोय? 'या' पदार्थांचे करा सेवन

दैनंदिन कामे करण्यासाठी शरीरात ऊर्जेची गरज असते. त्यासाठी योग्य आहार घेणे गरजेचे असते. रोजच्या कामाच्या गडबडीमध्ये आपल्याला आहाराकडे पुरेसे लक्ष देता येत नाही, त्यामुळे कधीकधी आपल्याला दिवसभर अशक्तपणा आणि थकवा जाणवतो. यासाठी योग्य आणि पुरेसा आहार घेणे गरजेचे आहे. काम करताना थकवा जाणवतो, दिवसभर आळस येणे, सतत अशक्तपणा जाणवणे, कोणत्याही कामात मन न लागणे ही सर्व शरीरात ऊर्जेची कमतरता असण्याची प्रमुख लक्षणे आहेत. शरीरातील ऊर्जेची कमतरता भरून काढण्यासाठी योग्य आहार घेणे आवश्यक आहे. त्यातही काही असे पदार्थ आहेत जे शरीरला त्वरित ऊर्जा देतात. जे खाल्ल्याने तुम्ही दिवसभर उत्साहात सर्व कामे करू शकता, तसेच तुम्हाला जाणवणारा थकवादेखील दूर होतो. आता शरीराला ऊर्जा देणारे पदार्थ कोणते आहेत जाणून घेऊया. दररोज केळी खाल्ल्याने शरीरात बरेच बदल होतात. त्वरित ऊर्जा मिळविण्यासाठी रोजच्या आहारामध्ये केळ्यांचा समावेश करा. केळी सर्वांनाच आवडतात. लहान मुलांचे तर हे आवडते फळ असते. जर तुम्हाला अशक्तपणा जाणवत असेल तर केळी खा, त्यामुळे नक्कीच फायदा मिळेल.



कॉफीचा समावेश एनर्जी ड्रिंकमध्ये केला जातो. जर तुम्हाला अशक्तपणा जाणवत असेल तर तुम्ही कॉफी पिऊ शकता. कॉफीमुळे अशक्तपणा कमी होऊन, काम करण्याचा उत्साह वाढेल. कॉफी प्यायल्याने त्वरीत ऊर्जा मिळते, म्हणून कॉफीला ऊर्जेचे स्त्रोत मानले जाते. अशक्तपणा जाणवत असल्यास तुम्ही ब्राऊन राईस खाऊ शकता. ब्राऊन राईसमध्ये पोषक तत्वे असतात. जी शरीरात ऊर्जा निर्माण करण्यास मदत करतात. त्यामुळे अशक्तपणा आणि थकवा जाणवत असेल तर ब्राऊन राईसचा आहारात समावेश करा. याबरोबरच त्वरीत ऊर्जा मिळवायची असेल तर रताळ्याचे सेवन करावे. रताळे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. तसेच लहान मुलांपासून ज्येष्ठ मंडळींपर्यंत रताळे सर्वांनाच आवडतात. त्यामुळे रोजच्या आहरातदेखील याचा समावेश करण्यास हरकत नाही. रताळे खाल्ल्याने शरीरातील पोषक तत्वांची कमतरता भरून निघते. थकवा आणि अशक्तपणा जाणवत असल्यास खजूर खाण्याचा सल्ला दिला जातो कारण त्यात नैसर्गिक साखर असते, ज्यामुळे शरीराला त्वरीत ऊर्जा मिळते.

# केंद्रीय मंत्री प्रल्हादसिंह पटेल उद्या पेणमध्ये

**पेण : प्रतिनिधी**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड मतदारसंघाची चाचपणी करण्यासाठी केंद्रीय जलजीवन मंत्री प्रल्हादसिंह पटेल कोकण व रायगड दौऱ्यावर आले असून बुधवारी (दि. २४) पेणमध्ये त्यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. या बैठकीच्या तयारीसाठी भाजपचे रायगड लोकसभा मतदारसंघाचे संयोजक वैकुंठ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पेण येथील वनस्पतीदेवी बँकेच्या सभागृहात रविवारी (दि. २१) आढावा बैठक घेण्यात आली.


(छाया : अनिस मनियार)

येत्या लोकसभा निवडणुकीत भाजपचे जास्तीत जास्त खासदार निवडून आणावयाचे असल्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रणनिती तयार केली आहे. त्यानुसार केंद्रीय जलजीवन मंत्री प्रल्हादसिंह पटेल कोकण व रायगड लोकसभा मतदार संघाच्या दौऱ्यावर आले आहेत. लोकसभा निवडणूक होईपर्यंत ते हर एक महिन्यातून आपल्याकडे उपस्थित राहणार आहेत. ना. प्रल्हादसिंह पटेल बुधवारी आपल्या विभागात येत आहेत. पेण तालुक्याला त्याचा मोठा फायदा करून घ्यावा लागेल, असे वैकुंठ पाटील यांनी या बैठकीत सांगितले.

केंद्रीय मंत्री प्रल्हादसिंह पटेल यांच्या हस्ते वाशी विभागातील प्रतिष्ठित व्यक्तींचा सत्कार करण्यात येणार आहे. बुधवारी होणाऱ्या कार्यक्रमाला जास्तीत जास्त ग्रामस्थांनी उपस्थित रहावे, असे आवाहन वैकुंठ पाटील यांनी या वेळी केले.

भाजपचे पेण तालुका अध्यक्ष श्रीकांत पाटील, वाशी गावचे सरपंच गोरख पाटील, दादर गावचे सरपंच विजय पाटील, वढाव सरपंच पूजा पाटील, जितू म्हात्रे, सूर्यहास पाटील यांच्यासह वाशी विभागातील अनेक गावातील सरपंच, पदाधिकारी व कार्यकर्ते या आढावा बैठकीला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुरूडमधील शिव मंदिरात भाविकांची दर्शनासाठी गर्दी

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील गुरव पाखाडी जवळील प्राचीन शिव मंदिरात सोमवारी (दि. २२) पहाटेपासूनच दर्शनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. शेवटच्या श्रावण सोमवार निमित्त हर हर महादेवच्या गजरात महादेवाला विधिवत रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर महाआरती करून भक्तांना मंदिरात दर्शनासाठी प्रवेश देण्यात आला.



मागच्या वर्षी कोरोनामुळे भक्तांना मंदिरात गर्दी करण्याची परवानगी नव्हती. त्यामुळे भक्तांना घरीच पूजा करून समाधान मानावे लागले होते. मात्र यावर्षी थेट गाभाऱ्यात प्रवेश करून भक्तांना शिवलिंगावर बेल, फुले वाहून पूजा करायला मिळत आहे. त्यामुळे सोमवारी पहाटेपासूनच मंदिरात पूजेसाठी भक्तांची लांबच लांब रांग लागली होती.

# पोटल पाली–भालिवडी मार्गावरील प्रवास गणेशोत्सवापूर्वी होणार सुखकर


(छाया : विजय मांडे)

**पावसाळ्यात भालिवडी ते पोटल पाली या मार्गावर जागोजाग खड्डे पडले होते. गणेशोत्सवापूर्वी या मार्गावरील खड्डे भरण्यात यावेत, याबाबत स्थानिक आमदार महेंद्र थोरवे व जिपचे कर्जत उपविभागीय बांधकाम अभियंता यांच्याशी अनेकवेळा चर्चा करण्यात आली होती. गणेशोत्सवापूर्वी या मार्गावरील खड्डे भरण्यात येत आहेत, त्यामुळे या रस्त्यावरील प्रवास सुखकर होईल.**
**–विलास श्रीखंडे, ग्रामस्थ, पोटल, ता. कर्जत**

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील पोटल पाली ते भालिवडी या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली होती. या रस्त्याचे खड्डे भरावेत अशी मागणी या परिसरातील ग्रामस्थांची होती. याबाबत आमदार महेंद्र थोरवे यांनी लक्ष घातले आणि गणेशोत्सवापूर्वी या रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम सुरू झाल्याने या मार्गावरील प्रवास सुखकर होणार आहे.

कर्जत तालुक्यातील वंजारवाडी ते भिवपुरी पॉवर स्टेशन या मार्गाचे काम ९ सप्टेंबर २०१४ रोजी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत दोन कोटी ७६ लाख १९ हजार रुपये खर्च करून करण्यात आले होते. मात्र, देखभाल, दुरुस्तीचा कालावधी संपल्यानंतर पावसाळ्यात या मार्गाच्या पोटल पाली ते भालिवडी या टप्प्यातील रस्त्याची दुरवस्था झाली होती. त्यामुळे या मार्गावरील भालिवडी, आंबोट, पोटल, पाली व तीन आदिवासी वाड्यांमधील नागरिकांसह व्यापारी, नोकरदार, विद्यार्थी, प्रवासी वाहतूक करणारी वाहने व प्रवासी यांना प्रवास करणे मोठी जिगरीचे झाले होते. पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी स्थानिक आमदार महेंद्र थोरवे यांची भेट घेतली व या रस्त्यावरील खड्डे तात्पुरत्या स्वरूपात भरल्यास पावसाळ्यात या मार्गावरून प्रवास करणे सोपे होईल, असे सांगितले. तसेच जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कर्जत येथील उपविभागीय अभियंता कार्यालयात वारंवार चर्चा व निवेदन सादर करून सदर रस्ता प्रवासायोग्य करण्यात यावा, अशी मागणी केली होती.

आमदार थोरवे यांच्या सूचनेची बांधकाम विभागाने तात्काळ दखल घेत पोटल पाली ते भालिवडी या मार्गावरील खड्डे भरण्यास सुरुवात केली असल्यामुळे येणाऱ्या गणेशोत्सवापूर्वी हा मार्ग प्रवासासाठी उपयुक्त ठरणार आहे.

# सद्भावना दिनानिमित्त मांडला येथे परिसंवाद

**रेवदंडा : प्रतिनिधी**

भारताकडून जगाला सद्भावनेची शिकवण मिळाली. आपल्या देशात विविधतेत एकता आहे, ती या सद्भावनेमुळेच, असे प्रतिपादन मुरुड तालुक्यातील मांडला ग्रामपंचायतीच्या माजी सरपंच साक्षी गायकवाड यांनी केले.

नेहरु युवा केंद्र संघटन–अलिबाग आणि ओएसीस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था–रेवदंडा यांच्या संयुक्त विद्यमाने मांडला येथे सद्भावना दिवस साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने आयोजित केलेल्या परिसंवादात साक्षी गायकवाड बोलत होत्या. भगवान बुद्धांनी सर्वप्रथम जगाला सद्भावनेची शिकवण दिली, असे त्यांनी या वेळी सांगितले.



भगवान बुद्ध वंदनाने कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. ओएसीस संस्थेचे अध्यक्ष प्रतिक कोळी यांनी प्रास्ताविक केले. त्यानंतर सामाजिक कार्यकर्ते यज्ञेश पाटील यांच्या नेतृत्वांतर्गत 'सद्भावना : जागतिक पटलावर भारताचे योगदान' या विषयावर परिसंवाद झाला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्थक गायकवाड यांनी केले. प्रदर्शन विघ्नहर्ता स्पोर्ट्‌स क्लबचे प्रशिक्षक दर्श नागोठकर यांनी आभार मानले.

# लायन्स क्लबकडून मुरूडमध्ये शालोपयोगी साहित्याचे वाटप


**मुरूड : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ अलिबागच्या वतीने मुरुड तालुक्यातील कोर्लई आणि मांडला येथील मराठी शाळांना वॉटर प्युरिफायर आणि मेडिकल कीटचे वाटप करण्यात आले.


(छाया : संजय करडे)

लायन्स क्लबचे महेश कवळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन पाटील, भारती जोशी, प्रसाद साळावकर, सदस्य, जिपच्या माजी सदस्य राजश्री मिसाळ, कोर्लई शाळेच्या मुख्याध्यापिका मानसी कवळे, मांडला शाळेच्या मुख्याध्यापिका समीक्षा नांदगावकर, शिक्षक रमाकांत ठाकूर, हेमंत भोईर, अस्मिता भगत, हर्षला ठाकूर यांच्यासह शिक्षक, पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी या वेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिक्षक नितीन पाटील यांनी अलिबाग लायन्स क्लब सदस्यांचे आभार मानले.

# छायाचित्रकार सुधीर नाझरे यांना फोटोग्राफिक आर्ट पदवी प्रदान



**मुरूड : प्रतिनिधी**

जागतिक छायाचित्रण दिनाचे औचित्य साधून आंध्र प्रदेश अकादमी–विजयवाडा या संस्थेने मुरूड येथील प्रसिध्द छायाचित्रकार सुधीर नाझरे यांना अमेरिकेची एक्सलन्स फेडरेशन मल्टीकल्चरल फोटोग्राफिक आर्ट (EFMPA) ही पदवी प्रदान केली. ही पदवी प्राप्त करणारे सुधीर नाझरे रायगड जिल्ह्यातील पहिले छायाचित्रकार असल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

सुधीर नाझरे हे १९९९सालापासून वृत्तपत्र छायाचित्रण क्षेत्रात कार्यरत आहेत. त्यांना विविध देशाच्या जागतिक छायाचित्रण स्पर्धेत अनेक पदके मिळाली आहेत. नाझरे यांची महाराष्ट्रात १२ ठिकाणी फोटो प्रदर्शने झाली आहेत, तर २९ विविध पुरस्काराने गौरविले आहे.

**कर्जत : श्री गणेशोत्सव जवळ आला आहे. सजावटीसाठी थर्माकोलच्या वापरावर बंदी आहे. या पार्श्वभूमीवर पुणे येथील ज्योती पाटील यांनी पळसदरी येथील श्री स्वामी समर्थ मठामध्ये कागद व कापडापासून सुंदर फुले, गुच्छ आदी तयार करण्यासाठी मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन केले होते. या वस्तूंचा वापर सजाावटीसाठी करता येईल.**
(छाया : विजय मांडे)



**श्री. सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**सहकार विभाग, महाराष्ट्र शासन नियुक्त**

व्दारा : कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल; ६२६ अे/७ बी, श्रीकृष्ण निवास, रामदास मारूती मंदीराशेजारी, टिळक रोड, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड– ४१०२०६. फोन नंबर ०२२–२७४६९८६५.

**जाहिरात तात्काळ**
**नमुना झेड**
**[ नियम १०७ पोट–नियम (११ (ड ११) पहा ]**
**स्थावर मालमत्तेचा ताबा घेण्याबाबतची नोटीस**

ज्या अर्थी खाली सही केलेले वसुली अधिकारी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित,पनवेल हे महाराष्ट्र महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ अन्वये असून दि.०४.११.२०१९ रोजी ऋणको १) श्री. सचिन बळीराम पाटील २) श्री. बळीराम शंकर पाटील ३)श्री. साईराज काशिनाथ पाटील ४) रोहिदास चंद्रकांत ठाकूर यांना मागणी नोटीस देऊनही नोटीशीमध्ये नमुद केलेली रक्कम रू.२२४७२३४/– (अक्षरी रूपये बावीस लाख सत्तेचाळीस हजार दोनशे चौतीस मात्र.) सदर नोटीस मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत भरणेबाबत कळविले होते आणि ऋणको याने रक्कम जमा करण्यास कसूर केली आहे, त्यामुळे खाली सही करणार यांनी दि. ०७.०७.२०२२ रोजी जप्तीची नोटीस दिली असून, पुढे निर्दिष्ट केलेली मालमत्ता २५.०७.२०२२ रोजी जप्त करण्यात आली आहे.

ऋणकोने रक्कम जमा करण्यास कसूर केल्यामुळे, ऋणकोला याप्रमाणे नोटिस देण्यात येत आहे आणि सर्व नागरिकांना, खाली निर्दिष्ट केलेल्या मालमत्तेचा खाली सही करणाऱ्याने त्याला महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६१ मधील नियम १०७ पोट–नियम ११ (ड–११) अन्वये दिलेल्या अधिकारानुसार २५.०७.२०२२ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषकरून ऋणकोला आणि सर्व नागरिकांना याव्दारे सावध करण्यात येत आहे की, मालमत्तेसंबंधी कोणताही व्यवहार करू नये आणि व्यवहार केल्यास कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी (मर्या.) पनवेल यांच्या बोजाची रक्कम रू.२२४७२३४/– (अक्षरी रूपये बावीस लाख सत्तेचाळीस हजार दोनशे चौतीस मात्र.) आणि त्यावरील व्याज याला आधीन रहावे लागेल.

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० [ नमुना 'झेड'] स्थावर मालमत्तेचे वर्णन**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील आणि सब रजिस्ट्रार पनवेल यांच्या अधिकार कक्षेतील मौजे कळंबोली, ता–पनवेल, जि–रायगड, हद्दीतील सेक्टर–१३, प्लॉट नं. १, वरील लॅकस्मिथ कॉर्नर १ मधील शॉप नं. ४, तळमजला, ३६०, चौ.फुट कारपेट म्हणजेच ४०५ चौ.फुट बिल्टअप ही मिळकत.

| गावाचे नाव | मालमत्ता धारकाचे नाव | मिळकतीचे वर्णन | क्षेत्र |
|---|---|---|---|
| मौजे कळंबोली, सेक्टर–१३, प्लॉट नं.१, ता–पनवेल, जि–रायगड | श्री. बळीराम शंकर पाटील | मौजे कळंबोली, ता–पनवेल, जि–रायगड, हद्दीतील सेक्टर–१३. प्लॉट नं. १, वरील ब्लॅकस्मिथ कॉर्नर १ मधील शॉप नं. ४, तळमजला, ३६० चौ.फुट कारपेट म्हणजेच ४०५ चौ.फुट बिल्टअप | ३६० चौ.फुट कारपेट म्हणजेच ४०५ चौ.फुट बिल्टअप. |

दिनांक : २३/०८/२०२२
ठिकाण : पनवेल

शिक्का

**सही/–**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली व विक्री अधिकारी**
महाराष्ट्र शासन (सहकार खाते)
विक्री व वसुली अधिकारी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी म. पनवेल.
वसुली अधिकारी
महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ नियम १९६१चे नियम १०७ अन्वये अधिकार प्राप्त

अर्जदाराचे वकील : ॲड. विजया रा. म्हात्रे

**जाहीर नोटीस**
**उरण येथील मे. दिवाणी न्यायाधिश क–स्तर यांचे न्यायालय**

नि. ७/ड
ने.ता. २८/०८/२२
दि.चौ. अ.क्र. १४६/२०२२

१) श्रीम. बयाव उर्फ बयवबाई काशिनाथ पाटील,
वय : ७४ वर्षे, धंदा : गृहिणी,
रा. रांजणपाडा, ता. उरण, जि. रायगड.
२) कै. मधु उर्फ मधुकर नारायण म्हात्रे (मयत)
कै. नामुबाई मधुकर म्हात्रे (पत्नी मयत),
यांचे वारसदार
२/१) श्री. प्रकाश मधुकर म्हात्रे,
वय : ६३ वर्षे, धंदा : सेवानिवृत्त,
२/२) श्री. यशवंत मधुकर म्हात्रे,
वय : ५४ वर्षे, धंदा : नोकरी,
२/३) श्री. अशोक मधुकर म्हात्रे,
वय : ५२ वर्षे, धंदा : शेती,
२/४) श्री. जगदिश मधुकर म्हात्रे,
वय : ४९ वर्षे, धंदा : शेती,
वरील सर्व रा. जासई, ता. उरण, जि. रायगड .
२/५) सौ. सुमन भगवान घरत,
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी,
रा.जांभुळपाडा, ता. उरण, जि. रायगड.
३) कै. चंदर नारायण म्हात्रे (मयत)
उर्फ चंद्रकांत नारायण म्हात्रे
कै. बामुबाई चंदर म्हात्रे (पत्नी मयत)
यांचे वारसदार
३/१) श्री . नरेन्द्र चंदर म्हात्रे,
वय : ५३ वर्षे, धंदा : नोकरी ,
३/२) श्री. अमर चंदर म्हात्रे,
वय : ४८ वर्षे, धंदा : नोकरी ,
३/३) श्रीम. अंजली चंदर म्हात्रे,
वय : ६१ वर्षे, धंदा : गृहिणी ,
वरील अर्जदार नं .२/१ ते २/३
रा. वेश्वी, ता. उरण, जि. रायगड.
३/४) सौ . दिपीका दिपक खुटले,
वय : ५१ वर्षे, धंदा : गहिणी,
रा. गोविंद हौऊसिंग सोसायटी, गाऊंडफ्लोर,
फ्लॅट नं.१, उर्दू प्रा. शाळाजवळ,
तक्का, ता. पनवेल, जि. रायगड.
३/५) सौ. सुषमा संतोष पाटील,
वय : ४३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा. पाणदिवे कोप्रोली, ता. उरण, जि. रायगड.
३/६) कै. उदय चंदर म्हात्रे (मयत),
यांचे वारसदार
३/६/१) श्रीम. आशा उदय म्हात्रे
वय : ५३ वर्षे, धंदा: गृहिणी ,
३/६/२) श्री. रोहीत उदय म्हात्रे
वय : ३५ वर्षे, धंदा : नोकरी,
वरील अर्जदार ३/६/१ व ३/६/२
रा. वेश्वी, ता. उरण, जि. रायगड .

**अर्जदार**

**विरूध्द**

कोणीही नाही

या जाहीर नोटीसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे, वरील अर्जदार नं.१ यांचे वडिल व अर्जदार नं.२/१ ते ३/५ यांचे आजोबा तसेच अर्जदार नं.३/६/१ व ३/६/२ यांचे पणजोबा कै. नारायण हासू म्हात्रे हे दिनांक : ०८/११/१९८६ रोजी मौजे–जासई, ता. उरण, जि. रायगड येथे राहत्या घरी मयत झाले आहेत सदर मयत व्यक्तिस खालील प्रमाणे वारसदार आहेत. त्यांचे नावे असणाऱ्या जमीन मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे

**अ) मौजे : जासई, ता. उरण, जि. रायगड**
**भूसंपादीत मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे/युनिट केस | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | जासई १३६/१२० | १७२ | ९ड | ०.१३.०० | ०.४१ |
| २ | जासई २३८/२१२ | २४४<br>२४५ | ३<br>१ | ०.०९.१२<br>०.०६.८० | १.४४<br>०.८९ |

**ब) मौजे : जासई, ता. उरण, जि. रायगड**
**भूसंपादीत मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे/युनिट केस | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | जासई २०/९८ | १८१ | १० | ०.०१.६० पो.ख. ०.००.२० | ०.१२ |
| | | १८२ | ११ | ०.०२.५० | ०.२५ |

**क) मौजे : जासई, ता. उरण, जि. रायगड**
**भूसंपादीत मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | मौजे | सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|---|---|
| १ | जासई | २४१ | ८ | पो.ख. ०.०३.०० | ०.०० |
| | | २४२ | ११ | ०.०७.४० पो.ख. ०.०४.०० | १.०६ |

येणे प्रमाणे जमीन मिळकतीचे वर्णन असून सदरहू जमीन मिळकतीच्या अनुषंगाने वारस दाखला मिळणे करीता अर्जदारांनी मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार हे कै. नारायण हासू म्हात्रे, कै. मधुकर नारायण म्हात्रे, कै. चंदर नारायण म्हात्रे उर्फ चंद्रकांत नारायण म्हात्रे व उदय चंदर म्हात्रे यांचे वारस नाहीत असे अगर अर्जदार यांस वारसदाखला देण्याबाबत अन्य कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी स्वत: अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांची हरकत ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत आवश्यक त्या कागदोपत्री पुराव्यासह ना. कोर्टात दाखल करावी, सदर मुदतीत हरकती न आल्यास कोणाची हरकत नाही, असे गृहित धरून ना. कोर्ट अर्जदार यांस वारसदाखला प्रदान करील व मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १६ माहे ऑगस्ट सन २०२२ रोजी माझ्या सहीनीशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/–**
**कनिष्ट लिपीक**
दिवाणी न्यायालय क.स्तर उरण

कोर्टाचा शिक्का

**सही/–**
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी/फौजदारी न्यायालय, उरण

## निवडक

### कांदळवन जनजागृती मोहीम

**कोपरखैरणे :** कांदळवन संवर्धन ही काळाची गरज आहे; अन्यथा समुद्र जीवांच्या भीषण संकटाला सामोरे जावे लागेल, असे मत नवी मुंबई पर्यावरण रक्षक समितीचे अध्यक्ष किसन कदम यांनी कांदळवन जनजागृती मोहिमेच्या वेळी घणसोली येथे व्यक्त केले. २६ जुलै जागतिक कांदळवन दिन म्हणून जनजागृती स्वरूपात विविध कार्यक्रम, व्याख्याने, सरकारी जाहिरातीच्या माध्यमातून होते. मात्र त्यानंतर कांदळवनांककडे दुर्लक्ष होत असल्याने भविष्यात त्याचे गंभीर परिणाम होणार असल्याचे कदम यांनी या वेळी सांगितले.

### कार्यशाळेतून उद्योजक होण्याचा कानमंत्र

**खारघर :** स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवी वर्षाचे औचित्य साधून प्रजा सक्षमीकरण महासभेच्या वतीने नवी मुंबई, पनवेल परिसरातील तरुणांसाठी 'चला उद्योजक होऊ या' हे अभियान राबविले आहे. या अभियानाअंतर्गत सुरू झालेल्या प्रशिक्षण कायर्शाळेचे उद्घाटन मुंबई येथील साठे महाविद्यालयाच्या अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रतिभा हावरगेकर यांच्या हस्ते झाले. या वेळी सत्याग्रह महाविद्यालयाचे संस्थापक डॉ. जी. के. डोंगरगावकर, मानस भोसले, क्रांती कांबळे, सुजीत शिंदे आदी उपस्थित होते. उद्योग क्षेत्रातील नव्या संधीचा शोध, या कार्यशाळेतून घेतला जाणार आहे.

### मनसे तालुका अध्यक्षपदी भगत

**उरण :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या उरण तालुका अध्यक्षपदी सत्यवान भगत यांची निवड झाली आहे, तर मनसेच्या उरण तालुका सचिवपदी आल्पेश कडू यांची निवड करण्यात आली आहे. आगामी निवडणुका डोळ्यासमोर ठेवून मनसेचे नेते राज ठाकरे यांनी उरण विधानसभा मतदारसंघात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची ताकद वाढविण्यासाठी हे बदल केले आहेत.

### तुलसी विहारमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव

**उरण :** तालुक्यातील द्रोणागिरी नोड सेक्टर ५२ तुलसी विहार येथे सामाजिक कार्यकर्ते दामोदर ठोंबरे यांच्या



मार्गदर्शनाखाली येथील रहिवाश्यांच्या सहकार्याने श्री कृष्ण जन्मोत्सव मोठ्या आनंदात व उत्साहात साजरा करण्यात आला यंदाचे पहिले वर्ष असून सह कुटुंब सह परिवार या सोहळ्यात सहभागी झाले होते. गुरुवारी रात्री १२ वाजता सामाजिक कार्यकर्ते दामोदर ठोंबरे व सुरेखा ठोंबरे यांच्या हस्ते श्री कृष्णचा पाळणा व आरती करून प्रसाद वाटण्यात आले. त्याचप्रमाणे दहीहंडी फोडण्यात आली. या वेळी सर्व कुटुंबीय मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### बंद पथदिवे सुरू करण्याची मागणी

**नवी मुंबई :** घणसोली येथील पामबीच रोड ते साई मंदिर व पुढे कोपरखैरणे रोडवरील बहुतेक सर्व पथदिवे बंद असल्यामुळे या भागातील लोकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे पालिकेने ही समस्या कायमस्वरूपी निकालात काढत हे पथदिवे सुरू करावेत, अशी मागणी स्माईल फाऊंडेशनचे घणसोली विभाग अध्यक्ष अमोल सावंत यांनी केली आहे. सध्या घणसोलीतील साई मंदिर, घणसोली बस डेपो, मेघ मल्हार संकुल ते पुढे कोपरखैरणेकडे जाणारा मार्गावरील पथदिवे बंद अवस्थेत आहेत. अनेकदा तात्पुरती उपाययोजना करून हे पथदिवे सुरू केले जातात; मात्र पुन्हा पथदिवे बंद पडत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे.

# उरणच्या गणेशमूर्तिकारांवर खंडित वीजपुरवठ्याचे विघ्न

**उरण : वार्ताहर**

उरण परिसरात विजेच्या दररोजच्या सुरू असलेल्या खेळ खंडोब्यामुळे गणेशमुर्ती घडविणारे शेकडो कारखानदार संकटात सापडले आहेत. वीजेच्या या सावळागोंधळामुळे मात्र ग्राहकांना गणेशमुर्ती वेळेवर देण्यासाठी भाड्याने जनरेटर घ्यावा लागत आहे. या अतिरिक्त खर्चामुळे कारखादारांचे आर्थिक बजेटही कोळमडले आहे.

गणेशोत्सव अवघ्या दहा दिवसांवर येऊन ठेपला आहे. त्यामुळे उरण परिसरातील श्री गणरायाची मूर्ती घडवणाऱ्या कारखान्यातील मूर्तिकारांची सध्या जोरदार लगबग सुरू आहे. मुर्ती तयार होऊन सुकल्यानंतर रंगसंगतीच्या कामाला सुरुवात होते. त्यामुळे कारखान्यातील शेकडो मुर्तीकार गणेशाच्या रंगसंगतीच्या कामात गुंतले आहेत, मात्र त्यांना स्प्रेद्वारे शेडिंगचे रंगकाम करताना विजेविना मोठी समस्या निर्माण होत आहे. उरण परिसरात दररोज वीज पुरवठा वारंवार खंडित होत आहे. मूर्तिकारांचे रंगरंगोटीचे महत्त्वपूर्ण काम अगदी हातघाईवर आले असताना लपंडाव खेळणारे विजेचे विघ्न त्रासदायक ठरत आहे.

(छाया : दिनेश पवार)



**रंगरंगोटी, सजावटीच्या कामांत खोळंबा**

दररोजच्या वीजेच्या लपंडावामुळे येथील शेकडो कारखानदारांना भाड्याच्या जनरेटरचा आधार घ्यावा लागत आहे. याआधीच गणेशमूर्तीच्या घडविण्यासाठी लागणाऱ्या साहित्याच्या किमतीत २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. त्यामध्ये आता गणेशमूर्तीकारांना जनरेटरच्या भाड्यासाठी अतिरिक्त पैसे मोजावे लागत आहेत. उरण परिसरात सुरू असलेल्या विजेच्या खेळ-खंडोब्यामुळे मूर्तिकार संकटात सापडलेल्या कारखानदारांना जनरेटरचा अतिरिक्त खर्च पेलवेनासा झाला आहे.

गणेशोत्सवात तरी ग्राहकांना वेळेवर मुर्ती मिळाव्यात यासाठी महावितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी जातीने लक्ष घालून किमान भोंगळ कारभार सुधारावा अशी माफक अपेक्षा येथील कारखानदारांची आहे. मुळातवारंवार वीज प्रवाह खंडित का होतो? हा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे, मात्र त्यांचे समर्पक उत्तर मिळण्यासाठी महावितरण कार्यालयाचा दूरध्वनी कायमच नॉट रिचेबल असतो. यदाकदाचित लागलाच तरी कर्मचारी, अधिकारी वर्ग ग्राहकांना व्यवस्थित उत्तरे देत नसल्याचे भाई चौलकर, नंदकुमार चिरनेरकर, रंगनाथ चौलकर, गजानन चौलकर, दामोदर चौलकर, संदेश चौलकर, सुनील चौलकर, प्रसाद चौलकर, विलास हातलोनकर, नारायण चौलकर, विष्णु चौलकर, प्रकाश चिरनेरकर, कुणाल चिरनेरकर, विजय चौलकर, राम चौलकर, नरेश हातनोलकर, जीवन चौलकर, अमित चिरनेरकर, अभिजित चिरनेरकर आदी कारखानदारांचे म्हणणे आहे.

उरण परिसरातील गणपती कारखान्यांमध्ये युद्धपातळीवर काम सुरू आहे, मात्र या विजेच्या लपंडावामुळे गणपती उद्योजक खूप संतापलेले आहेत. त्यातच अधिकारी वर्गही ग्राहकांना समाधानकारक उत्तर देत नाहीत. त्यामुळे परिसरात कायद आणि सुव्यवस्थेचा प्रश्न उद्भवण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**वीजची समस्या होती त्यामुळे आम्ही गणपती कारखानदारांना भेट दिली. तेथे तपासणी केली असता समजले की, चार-पाच दिवस सतत पाऊस असल्याने तेथील वीज तारा तुटल्या आहेत. तसेच एका ट्रकने केबलला धडक दिली असल्याने केबलही तुटली होती. त्यामुळे आम्ही तेथे काम केले आहे. आता वीजपुरवठा सुरळीत सुरू आहे.**

**-विजय सोनवणे,**
**अतिरिक्त कार्यकारी अभियंता, एमएसइबी**

# वसतिगृहांची तपासणी करावी

## हिंदुत्वनिष्ठ संघटनांची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

सीवूड्स, नवी मुंबई येथील बेथेल गॉस्पेल चॅरिटेबल ट्रस्टच्या चर्चमधील वसतिगृहातील अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणाची सखोल चौकशी करून यात सहभागी असलेल्या सर्व दोषींवर कठोरात कठोर कारवाई व्हावी तसेच नवी मुंबईतील सर्व चर्चच्या अंतर्गत असलेल्या वसतिगृहांची चौकशी व्हावी या मागण्यांसाठी हिंदु जनजागृती समितीसोबत हिंदुत्वनिष्ठ संघटनांच्या शिष्टमंडळाने नवी मुंबई पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह यांना निवेदन दिले.



या वेळी पोलीस आयुक्त म्हणाले, या प्रकरणातील गुन्हेगारांना साहाय्य करणाऱ्यांविषयी माहिती आम्हाला दिल्यास आम्ही त्याची अवश्य दखल घेऊ. तसेच अशी प्रकरणे पुन्हा होऊ नयेत यासाठी तपासणीसाठी आमचे वेगळे पथक नेमले असून त्यालाही आम्ही योग्य ते निर्देश दिले आहे.

निवेदन देताना शिष्टमंडळात आंतरराष्ट्रीय हिंदू परिषद आणि राष्ट्रीय बजरंग दलाच्या कोकण प्रांताचे जिल्हा सहमंत्री दीपकराज ठाकूर, खारघर प्रखंड विभागाचे सुधीर मलिक, धर्मप्रचारक राजेश चौहान, एक मुठ्ठी अनाज योजनेचे उपाध्यक्ष विपिन सोलंकी, राष्ट्रीय महिला विधानसभा (पनवेल) उपाध्यक्ष हर्षदा कुलकर्णी, भाजप युवा मोर्चाचे महामंत्री गुलाबकुमार नाविक, धर्मप्रेमी अवदेश चौहान, हिंदू जनजागृती समितीच्या डॉ. ममता देसाई, वसंत सणस आणि रमेश सनिल उपस्थित होते.

निवेदनात चर्च अंतर्गत असलेल्या वसतीगृहांची प्रत्यक्ष पाहणीसाठी आमदार, स्वयंसेवी संस्था, पत्रकार, पोलीस आणि महिला प्रतिनिधी यांची एक समिती नेमण्यात यावी. अशा ख्रिस्ती संस्थांच्या ट्रस्टची नोंदणी रहित करण्यात यावी या मागण्या सुद्धा करण्यात आल्या आहेत. दरम्यान, पोलीस ठाण्यात केलेल्या तक्रारीनुसार हे वसतीगृह चालवणारा राजकुमार येशुदासन याला अटक केली असून पुढील तपासही सुरू आहे.

ईश आराधना आणि सेवाभावी कार्याच्या नावाखाली ख्रिस्ती संस्थांमधून चालू असलेली वासनांधता मानवतेला काळिमा फासणारी आहे. या घटनेविषयी संताप व्यक्त करण्यात येत असून सर्व दोषींवर कठोर कारवाईची मागणी होत आहे.

# गावदेवी मैदानाबाहेर साठले कचऱ्याचे ढीग

## संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

नेरूळ विभागातील कुकशेत गाव, सेक्टर १४, गावदेवी मैदानाबाहेर उघड्या जागेवर मोठ्या प्रमाणावर कचरा टाकला जात आहे. तसेच पावसाळ्यापूर्वी वृक्ष छाटणी केलेल्या झाडाच्या फांद्यादेखील पदपथांवरच टाकल्या गेल्या असल्यामुळे परिसराला बकाल स्वरूप आले आहे.

कचराकुंडी मुक्त शहर करण्याच्या अनुषंगाने गेल्या काही वर्षांपासून महापालिकेच्या माध्यमातून शहरातील कचराकुंड्या टप्प्याटप्प्याने कमी करण्यात येत आहे. कचरा संकलनासाठी महापालिकेच्या माध्यमातून घंटागाडी वापरण्यात येत आहेत; परंतु कुकशेत गावातील उद्यानाबाहेरच पदपथावरच नागरिकांकडून कचरा टाकला जात आहे. त्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली असून मैदानात येणाऱ्यांना कचऱ्यातून वाट काढण्याची वेळ आली आहे.

पावसाळ्यात उघड्यावरच पडलेला कचरा कुजल्यामुळे सर्वत्र दुर्गंधीदेखील पसरली असून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पदपथावर कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी स्थानिकांमधून होत आहे.



# मोहोपाडा येथे डॉक्टरांसाठी सुसज्ज कक्षाची उभारणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा येथील प्रवेशद्वाराजवळ असणाऱ्या प्रसिद्ध वंदना मेडिकलचे मालक अरुणशेठ पाटील यांनी मेडिकलच्या बाजूलाच परिसरातील सर्व प्रकारच्या रुग्णांची चांगल्या पद्धतीने सेवा व्हावी हा उदात्त हेतू डोळ्यासमोर ठेवून अरुण पाटील यांनी डॉक्टरांसाठी सुसज्ञ असा कक्ष उभारला आहे.

मेडिकलच्या बाजूलाच सुसज्ञ असे दोन केबिन डॉक्टरांना बसण्यासाठी उपलब्ध करून दिले आहेत. या कक्षाचे गणेश पूजन करून साध्यापणाने उद्घाटन करण्यात आले. या ठिकाणी दररोज दुपारी ४ ते रात्री ९ या दरम्यान खोपोली येथील नामवंत जनरल प्रॅक्टिस फिजिशियन डॉ. यश गुप्ता या ठिकाणी उपलब्ध असणार आहेत. डॉ. गुप्ता हे बी. ए. एम. एस. व एमडी (स्कॉलर) असून त्वचारोग तज्ञ आहेत.

अरुण पाटील यांनी डॉक्टरांसाठी ही जागा उपलब्ध करून दिल्याने डॉ. यश गुप्ता यांनी त्यांचे आभार मानले. डॉ. यश गुप्ता प्रतिनिधीशी बोलताना म्हणाले की, गोरगरीब सामान्य रुग्णांना चांगल्या पद्धतीने सेवा देण्याचा प्रामाणिक प्रयत्न असेल असेही गुप्ता यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला डॉ. यश गुप्ता, वंदना मेडिकलचे मालक अरुणशेठ पाटील, वसंतशेठ पाटील, एडवोकेट अनुष्का पाटील, डॉ. जितेंद्र गुप्ता डॉ.शुभांगी गुप्ता, डॉ. महेश गुप्ता, यांचा उद्योजक आशुतोष यादव आदी मंडळी यावेळी उपस्थित होते.

# सर्प, पशु-पक्ष्यांविषयी जनजागृती शिबिर

**नवी मुंबई : बातमीदार**

तुर्भे नवी मुंबई येथील हनुमान नगर येथे भारतीय बौद्ध महासभा या शाखेच्या वतीने धम्म दीप बुध्द विहारामध्ये पशु-पक्ष्यांविषयी जनजागृती शिबिर झाले. वाईल्ड लाईफ संस्थेचे सदस्य, सर्पमित्र दीपक गायकवाड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

या शिबिरात विषारी व बिन विषारी साप कसे ओळखावे? तसेच आपल्याकडे आढळणाऱ्या सापांच्या जाती कुठल्या? व सर्पदंश झाल्यास काय करावे व काय करू नये साप दूध पितो का..? सापाच्या डोक्यावर केस असतात का..? सापाच्या डोक्यावर नगमणी असतो का..? या विषयी महत्व पूर्ण मार्गदर्शन व प्रबोधन केले. तसेच परिसरामध्ये कुठे ही साप किंवा जखमी पक्षी-प्राणी आढळून आल्यास त्यांना न मारता किंवा इजा न करता ताबडतोब वन्य जीवांचे रक्षण करणाऱ्या वाईल्ड लाईफ वेलफेयर या संस्थेच्या खालील हेल्पलाईन




नंबर वर संपर्क करा, असे आवाहन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते संजय जवादे, राजेंद्र बनसोडे, सुरेश गायकवाड, बाबासाहेब मेहते, विष्णू वासमणी, निसर्गन साहेब, आनंद पाचपिंडे, प्रवीण वाघमारे, रमेश धिवार, तर महिलांच्यावतीने सुशीला तरकसे, अयोध्याताई काशीद, निर्मला, गवळी, सुमित्रा पाचपिंडे, सुमन रणदिवे, शिला गायकवाड, सुरेखा गायकवाड, सुनीता वंजारे, मेघा वंजारे, परतवाघ वाघमारे यांनी मेहनत घेतली.

# कामगाराला लाखोंचा ऑनलाइन गंडा


**उरण : रामप्रहर वृत्त**

दैनंदिन व्यवहार ऑनलाईन करण्याकडे अनेकांचा कल असतो, पण त्यात फसवणूक होण्याचा धोका अधिक आहे. बीपीसीएलमधील एका कामगाराला तब्बल ७ लाख ६४ हजार ६९९ रुपयांचा ऑनलाईन गंडा घालण्यात आला आहे. श्यामकुमार बेनगिरी असे फसवणूक झालेल्या व्यक्तीचे



नाव आहे.

बीपीसीएल कंपनीत काम करणारे बेनगिरी यांना वीज बिल भरले नसल्यामुळे विद्युत पुरवठा बंद करण्यात येणार असल्याचा एक मेसेज आला होता. तसेच त्यांच्या मोबाइलवर लिंक पाठवून त्यावर माहिती भरण्यास सांगण्यात आली होते, मात्र बेनगिरी यांनी या लिंकवर क्लिक करताच त्याच्या खात्यातून तब्बल सात लाख ६४ हजार ६९९ रुपये काढून घेण्यात आले आहेत. या प्रकरणी उरण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालयातर्फे वृक्षारोपण

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने भारतीय स्वातंत्र्यांच्या अमृत दिनी पीरवाडी समृद्रकिनारा परिसरामध्ये वृक्षारोपण करण्यात आले.



महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम एन. गायकवाड, प्रा. के. ए. शामा, प्रा. व्हि. एस. इंदुलकर, प्रा. डॉ. एच. के. जगताप, प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण, प्रा. डॉ. एम. जी. लोणे, प्रा. रामकृष्ण ठवरे, प्रा. ए. के. गायकवाड, प्रा. डॉ. पराग कारूळकर, कार्यालयीन अधिषक तानाजी घ्यार, साईनाथ कदम, प्रा. रिया-हजय पठाण, प्रा. मेघा रेड्डी, प्रा. पुजा गुप्ता, प्रा. हन्नत षेख, प्रा. विनिता तांडेल आदी विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकरी प्रा. डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. पर्यावरणाचे जतन व संवर्धनाबरोबरच हे वृक्षारोपण पीरवाडीच्या समुद्रकिनाऱ्याच्या सौंदर्याला भर घालणारे ठरेल, असे प्रतिपादन या वेळी प्राचार्यांनी केले.

राम प्रहर

## श्रावणधारा


### श्रावण सरी

सरीवर सरी श्रावण सरी
धरणी मातेने पांघरला
हिरवा शालु भरजरी
ऐका पंचमहाभुताची किमया
पृथ्वी आप तेज वायु आकाश लिलया
कसा योग जुळून येतो या दुनिया
जल धारा बरसती धरणीवरी
श्रावण सरी श्रावण सरी ।।१।।

नदीनाले तुडुंब भरूनी वाहती
फुलपाखरु मनसोक्त बागळती
पक्षी किलबिलाट करती
मयुर पंखपिसारा फुलवती
जलधारा बरसती धरणीवरी
श्रावण सरी श्रावण सरी ।।२।।

नानाविध फुले उमलती
ऊनसावल्या नाच करती
इंद्रधनु नभाल तोरण बांधती
चहुकडे माणिक मोती बरसती
जलधारा बरसती धरणीवरी
श्रावण सरी श्रावण सरी ।।३।।

मन:शांती मिळे आत्मा, होई प्रसन्न
निसर्गाच्या सानिध्यात रोज करावे भ्रमण
असेच व्हावे सदा श्रावणाचे आगमन
जिवन होईल शतायुषी कदापी न मरण
जलधारा बरसती धरणीवरी
श्रावण सरी श्रावण सरी ।।४।।



-डॉ. जनार्दन महिसरे
(नवीन पनवेल)

# बाळगंगा नदी प्रदूषणप्रकरणी उत्तम स्टीलला बंदची नोटीस

## कामगारांच्या नोकरीवर गदा; तीव्र संताप

**खोपोली : प्रतिनिधी**

जलप्रदूषण केल्याप्रकरणी खालापूर तालुक्यातील उत्तम स्टील कारखाना व्यवस्थापनाला प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारखाना बंद करण्याची नोटीस दिली नोटीस दिली आहे. त्यामुळे या कारखान्यातील कामगारांच्या नोकरीवर गदा आली आहे. कारखाना व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणामुळे नोकरी धोक्यात आल्याने कामगार वर्गातून व्यवस्थापनाच्या विरोधात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

खालापूर तालुक्यामधील तांबाटी ग्रामपंचायत हद्दीतील उत्तम स्टील कारखान्यातील केमिकलयुक्त लालसर पाणी जावून १८ ऑगस्टला बाळगंगा नदी प्रदुषीत झाली. या नदीच्या पाण्यावर तांबाटी, नारंगी, नंदनपाडा, जांभिवली, गोरठण, होराळे, शिरवली याच्यासह १५ हुन अधिक ग्रामपंचयतीच्या पाणी योजना अवलंबून आहेत. नदीच्या दूषित पाण्यामुळे सुमारे ५० गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण झाल्याने तांबाटीचे सरपंच अनिल जाधव, जांभिवली ग्रामपंचयतीचे सरपंच दिनेश घाडगे, तसेच नितीन कदम, राकेश लाड, महेश सोगे, आशिष कोंडे, अविनाश कदम मोहन घाडगे, सुधीर दळवी, संतोष पाटील यांच्यासह परिसरातील ग्रामस्थ आक्रमक झाले.



(संग्रहित छायाचित्र)

दरम्यान, खालापुरचे तहसीलदार आयुब तांबोळी यांच्या आदेशावरून तलाठी माधव कावरखे व कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी करून पंचनामे केले. पाण्याचे नमुने घेऊन ते प्रदूषण नियंत्रण मंडळाचे प्रादेशिक अधिकारी व्ही. व्ही. किल्लेदार यांना सादर केले. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे फिल्ड ऑफिसर अरविंद धपाटे यांनी घटनास्थळी भेट देवून जल प्रदुषणाची खातरजमा केली. त्यानंतर किल्लेदार यांनी वरिष्ठ पातळीवर चर्चा करून उत्तम स्टीलच्या व्यवस्थापनाला कारखाना बंद करण्याचे आदेश पाठविले आहेत. त्यामुळे नोकरीवर गदा येण्याच्या भीतीने या कारखान्यातील कामगार धास्तावले आहेत.

**उत्तम स्टील या कारखान्याने १८ ऑगस्टला नाल्यावाटे काळ नदीत प्रदूषित पाणी सोडल्याचे निदर्शनास आले आहे. याच संदर्भात या आधीही कारखाना व्यवस्थापनाला अनेकवेळा नोटीस बजावण्यात आल्या होत्या, मात्र त्यात कोणतीही सुधारणा होत नव्हती. ही कंपनी नागरिकांच्या जीवाशी खेळत असल्याचे दिसून आल्याने कारखाना बंदची नोटीस बजावण्यात आली आहे.**
**–व्ही. व्ही. किल्लेदार, प्रादेशिक अधिकारी प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड**

**उत्तम स्टील व्यवस्थापनाला प्रदूषण नियंत्रण मंडळाने कंपनी बंद करण्याची नोटीस दिल्याने कारखान्यातील सुमारे दोन हजार कामगारांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळणार आहे, याचबरोबर परिसरातील ट्रान्सपोर्ट, हॉटेल, दुकाने, व इतर अनेक छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांवर आर्थिक संकट कोसळणार असल्याने शासनाने कंपनी बंदचा पुनर्विचार करावा.**
**–अनिल कर्णूक, कामगार नेते, उत्तम स्टील**

# सरसगडाच्या पायऱ्यांवरून घसरून तरुण पडला

## स्थानिक व रेस्क्यू टीमच्या मदतीने आणले खाली

**पाली, खोपोली : प्रतिनिधी**

सुधागड पालीतील सरसगड किल्ल्याच्या पायऱ्यांवरून घसरून रविवारी (दि. २१) सायंकाळच्या सुमारास एक तरुण खाली पडला. त्याचा डावा हात फॅक्चर झाला असून खांदा निखळला आहे व कमरेला मुका मार लागला आहे. स्थानिक तरुण व खोपोली येथील यशवंती हायकर्स टीमने या जखमी तरुणाला गडाखाली आणून पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले. त्यानंतर रात्री नऊच्या सुमारास त्याला पुढील उपचारासाठी मुंबई येथे नेण्यात आले.


(छाया : धम्मशील सावंत)

मुकुल जोशी (रा. मुलुंड, मुंबई) असे या जखमी तरुणाचे नाव आहे. तो चक्रम हायकर्स टीमचा सदस्य आहे. रविवारी अनेक जण सरसगडावर ट्रेकिंगसाठी आले होते. पावसाळा असल्याने किल्ल्याच्या पायऱ्या निसरड्या झाल्या आहेत. मुकुल हा वरच्या पायरीवरून पाय घसरून थेट खाली कोसळला. या घटनेची माहिती मिळताच स्थानिक तरुण अमित निंबाळकर, प्रदीप (दादू) गोळे, ज्ञानेश्वर जगताप, दर्शन तळेकर, रोहन राऊत, संकेत राऊत, सुमित राऊत अभिजीत वरंडे, व विवेक गुंड यांनी या तरुणाला स्ट्रेचरवरून खाली आणले. खोपोली येथील यशवंती हायकर्सचे सदस्य पद्माकर गायकवाड, महेंद्र भंडारे, रजाबापू, सगळगीले, मच्छिंद्र यादव, सनिज मांडलेकर, तुषार सावंत, निखिल गुरव, हरेश कोळी, पूजा सावंत, महेश मोरे यांनीही कामगिरी बजावली.

# रोह्यातील कवियत्री ज्योती शिंदे यांची जागतिक कविसंमेलनासाठी निवड

**रोहे प्रतिनिधी**

बुलंदी साहित्यिक सेवा समिती या संस्थने जागतिक ऑनलाइन कवी संमेलनासाठी रोह्यातील प्रसिध्द कवियत्री ज्योती परशुराम शिंदे यांची निवड केली आहे.

बुलंदी साहित्यिक सेवा समिती तर्फे दर वर्षी जागतिक पातळीवर ऑनलाइन कवी संमेलनाचे आयोजन करते. त्याचे प्रसारण संस्थेच्या यूट्यूब चॅनलद्वारे संपूर्ण जगभर केले जाते. गेल्या वर्षी संस्थने सलग २०७ तासांच्या कविसंमेलनाचे आयोजन करत इंडिया वर्ल्ड रेकॉर्ड पुस्तकात नोंद केली होती. यावर्षी २१ ऑगस्ट ते २ सप्टेंबर या कालावधीत सलग ३०० तास ऑनलाइन कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या वैशिष्ट्यपूर्ण कवी संमेलनात सहभागी होण्याची संधी रोह्याच्या ज्योती शिंदे यांना संस्थेद्वारे देण्यात आली आहे. त्याबद्दल मान्यवरांकडून ज्योती शिंदे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक हीच मेटे यांना खरी श्रद्धांजली ठरेल –सुनील पाटील

## खोपोलीत शोकसभा

**खोपोली : प्रतिनिधी**

अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्यासाठी सकल मराठा क्रांती मोर्चाचे विनायकराव मेटे आग्रही होते. मराठा समाजाला त्यांचे हक्काचे आरक्षण व प्रस्तावित छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक पूर्णत्वास नेणे, हीच स्वर्गीय विनायक मेटे यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे प्रतिपादन रायगड जिल्हा मराठा क्रांती मोर्चाचे समन्वयक सुनील पाटील यांनी रविवारी (दि. २१) ताकई (खोपोली) येथे केले.




स्व. विनायक मेटे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी रविवारी संध्याकाळी खोपोलीतील ताकई विठ्ठल मंदिर सभागृहात शोकसभा आयोजित करण्यात आली होती. मराठा क्रांती मोर्चाचे जिल्हा पदाधिकारी आणि खोपोली तसेच खालापूर तालुक्यातील मराठा समाज बांधव या शोकसभेला मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी दिवंगत मेटे यांच्या अपघाती मृत्यूबाबत संवेदना व्यक्त करून मराठा समाजाने आपला प्रमुख नेता गमावला असल्याचा भावना व्यक्त केल्या. तसेच अपघातानंतर मदत व प्रत्यक्ष उपचारासाठी झालेल्या विलंबाबत संताप व्यक्त केला.

# माणगाव नळ पाणीपुरवठा योजनांना मंजुरी

## आमदार भरत गोगावले यांच्या प्रयत्नांना यश

**माणगाव : प्रतिनिधी**

राज्य शासनाच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत माणगाव तालुक्यात अनेक गावांच्या पाणीपुरवठा योजनांच्या कामांना मंजूरी मिळाली असून, लवकरच ही कामे मार्गी लावू, अशी आमदार भरत गोगावले यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना दिली.

आमदार भरत गोगावले यांच्या पाठपुराव्यामुळे ग्रामीण पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्या आदेशाने माणगाव तालुक्यातील कोस्ते खुर्द, मशिदवाडी, मांजुर्णे, भागाड, थरमरी, केळगण, सांगी, जावठे, कडापुर आणि सणसवाडी या गावातील पाणीपुरवठा योजनांना जलजीवन मिशन योजने अंतर्गत मंजुरी देण्यात आली आहे. नामदार उदय सामंत यांच्या मुंबईतील निवासस्थानी आमदार भरत गोगावले आणि आमदार महेंद्र थोरवे यांच्या हस्ते शासकीय मान्यता मिळालेल्या कामांची प्रत देण्यात आली. या वेळी कोस्ते खुर्द ग्रामस्थ नितीन पवार, मनोज सावंत, प्रसाद जाधव, सचिन मोरे, संतोष जाधव उपस्थित होते.


(छाया : सलीम शेख)

**मंजूर पाणीपुरवठा योजना व खर्च**

| | |
|---|---|
| **कोस्ते खुर्द** | १ कोटी ८८लाख १४ हजार ७१९ |
| **मशिदवाडी** | १८ लाख ९ हजार ८९४ रु. |
| **मांजुर्णे** | ४४ लाख ५७ हजार ८२० रु, |
| **भागाड** | ९२ लाख ४९ हजार १४८ रु, |
| **थरमरी** | १ कोटी १८ लाख ४६ हजार ३७० रु. |
| **केळगण** | ८६ लाख ७५ हजार ५२३ रु, |
| **सांगी** | ५५ लाख ३० हजार ३३१ रु, |
| **जावठे** | ६२ लाख८८ हजार ६९५ रु, |
| **कडापुर** | ५१ लाख ५९ हजार ६०३ रु, |
| **सणसवाडी** | १ कोटी २८ लाख ७५ हजार ४६६ |

जलजीवन मिशन योजनेंतर्गत मंजुरी मिळाल्याने गावांची तहान भागणार आहे.

# कर्जतमधील रानभाजी महोत्सवाला ग्राहकांची मोठी गर्दी




(छाया : संतोष पेरणे)

**कर्जत : बातमीदार**

तालुका कृषी अधिकारी कार्यालयाच्या वतीने कर्जत कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दहिवली येथील सभागृहामध्ये रानभाजी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. कर्जत तालुक्याच्या आदिवासी भागातील शेतकऱ्यांनी महोत्सवात मोठ्या प्रमाणात रानभाज्या आणि जंगली भाज्या मांडल्या होत्या. या महोत्सवाला स्थानिक ग्राहक आणि शेतकऱ्यांनी मोठा प्रतिसाद दिला.

कर्जत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राचे शास्त्रज्ज्ञ आर. डी. सावळे यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्‌घाटन झाले. या रानभाजी महोत्सवात अळू, कुर्डू, शेवगा, टाकळा, माठ, भारंगी, लोत, कुडा, शेवळा, गाभोळी, कवळा, कुडाच्या शेंगा, आघाडा, भोकर, मोहाच्या दोडी आदी रानभाज्या तसेच रानभाज्यांचे विविध पदार्थ या महोत्सवात प्रदर्शन व विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे यांनी रानभाज्यांचे महत्त्व पटवून सांगितले. या रानभाजी महोत्सवात कर्जत तालुक्यातील अजित पाटील, मारुती बागडे, साधूराम पाटील, महादेव कोळंबे आदी प्रगतशील शेतकरीही सहभागी झाले होते. या महोत्सवात सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना प्रशस्तीपत्र देवून सन्मानित करण्यात आले. कर्जत मंडळ कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक यांनी या रानभाजी महोत्सवाचे नियोजन केले होते.

# देगाव शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याची भेट

**माणगाव : प्रतिनिधी**

आम्ही सह्याद्रीचे शिलेदार या संस्थेच्या वतीने माणगाव तालुक्यातीली देगाव येथील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना सोमवारी (दि. २२) शैक्षणिक साहित्य भेट देण्यात आले. संस्थे तर्फे उद्योजक गणेश हरिश्चंद्र काजरोळकर व सामाजिक कार्यकर्ते विनोद धोंडू वाढवळ यांनी शाळेतील १५ आदिवासी विद्यार्थ्यांना दप्तरे व चप्पल भेट दिल्या.

देगाव शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय गायकवाड, मुख्याध्यापक महेश विचारे,राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक शंकर शिंदे, विषय शिक्षक अजित लाड, सहशिक्षिका सोनिया खामकर, स्वयंपाकी समिक्षा दिवेकर यांच्यासह शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, शिक्षक आणि आदिवासी विद्यार्थ्यांच पालक या वेळी उपस्थित होते.




# शेलू येथील शिबिरात ३१० रुग्णांना चष्मे वाटप

**कर्जत : बातमीदार**

तालुक्यातील शेलू येथे सामाजिक कार्यकर्त्या रेखा हिरेमठ यांनी उल्हासनगर येथील साई प्लॅटिनम हॉस्पिटलच्या सहकार्याने नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात तब्बल ३१० रुग्णांना मोफत चष्मे वाटप करण्यात आले.



साई हिरेमठ यांच्या वाढदिवसानिमित्त पैलवान अनिकेत घुले यांच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्त्या रेखा हिरेमठ यांच्या शेलू रेल्वे स्थानकाजवळील कार्यालयात नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचे उद्‌घाटन कर्जत पंचायत समितीचे माजी सदस्य नरेश मसने यांच्या हस्ते करण्यात आले होते. साई प्लॅटिनम रुग्णालयाचे डॉ. सोहेल, सोमनाथ चव्हाण, श्रेहाल ननवरे यांच्या पथकाने शिबिरार्थींची नेत्र तपासणी केली. या वेळी रेखा हिरेमठ यांच्या हस्ते ३१०जणांना चष्मे वाटप करण्यात आले.कर्जत पंचायत समितीच्या माजी सभापती सुजाता मनवे, प्रा. हनुमंत भगत, शिक्षिका विनिता जंगम, तसेच दशरथ टेम्ब्रे, मंगेश तरे आदी या वेळी उपस्थित होते. स्थानिक ग्रामस्थ कृष्णा बोराडे, अक्षय हिसाळगे, योगेश देशमुख, मनोज शेकटे, विवेक पार्टे, अरमान शेख, अनिकेत भगत, विठ्ठल परब, अनिकेत खरमाळे, रमेश भोईर, संतोष मसणे, नरेश कराळे, रवी घारे, संजय मसणे, मनोज तरे, कविता भक्के यांनी हे शिबिर यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

# शुबमन गिलचे पहिलेवहिले शतक



## झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात तुफान फलंदाजी

**हरारे : वृत्तसंस्था**

हरारे येथे सोमवारी (दि. २२) खेळल्या गेलेल्या झिम्बाब्वेविरुद्धच्या तिसर्‍या एकदिवसीय सामन्यात भारताचा धडाकेबाज फलंदाज शुभमन गिलने जोरदार फलंदाजी केली आणि आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील आपले पहिलवहिले शतक केले. शुभमनने ९७ चेंडूंत १३० धावा केल्या.

भारतीय संघाचा कर्णधार केएल राहुलने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. शिखर धवन आणि राहुलने डावाची सुरुवात केली. राहुल ३० धावा करून बाद झाल्यानंतर शुभमन गिल फलंदाजीसाठी मैदानात उतरला. त्याने सुरुवातीपासूनच झटपट धावा केल्या. ८२ चेंडूत १२ चौकारांच्या मदतीने त्याने आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील आपले पहिले शतक पूर्ण केले. गिल आणि ईशान किशन जोडीने तिसर्‍या गड्यासाठी १२७ चेंडूंत १४० धावांची भागीदारी केली. भारताकडून गिलनेच सर्वाधिक १३० धावा केल्या. त्याच्याशिवाय इशान किशनने ५०, धवनने ४० आणि कर्णधार राहुलने ३० धावा केल्या.

वेस्ट इंडिज दौर्‍यातील एकदिवसीय मालिकेत शुभमन गिलला शतक झळकावण्याची संधी होती. पावसाच्या व्यत्यय आलेल्या सामन्यात त्याने ९८ धावा केल्या होत्या. याशिवाय २०२०-२१मधील ऑस्ट्रेलिया दौर्‍यातील कसोटी सामन्यात तो ९१ धावांवर बाद झाला होता. त्यामुळे त्याचे आंतरराष्ट्रीय अद्याप क्रिकेटमध्ये शतक झाले नव्हते. झिम्बाब्वेविरुद्धच्या सामन्यात त्याने ही कसर भरून काढली.

वृत्तानुसार शुबमन गिलला 'न्यूझीलंड अ'विरुद्ध होणार्‍या मालिकेत 'भारत अ' संघाचे नेतृत्व करण्याची संधी मिळू शकते. न्यूझीलंड अ संघ सप्टेंबरमध्ये भारत दौर्‍यावर येणार आहे. सध्या गिल अतिशय चांगल्या फॉर्ममध्ये आहे. वेस्ट इंडीज दौर्‍यातील तीन एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने ६४, ४३ आणि नाबाद ९८ धावा केल्या होत्या. झिम्बाब्वेविरुद्धच्या पहिल्या सामन्यात त्याने नाबाद ८२ धावांची खेळी केली, तर दुसर्‍या सामन्यात ३३ धावा केल्या होत्या.

शुभमन गिलने आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये जानेवारी २०१९मध्ये पदार्पण केले, तेव्हापासून त्याने ११ कसोटीत सात तर वनडे क्रिकेटमध्ये आठ अर्धशतकी खेळी केल्या आहेत. गिल काही वेळा नव्वदीतदेखील पोहचला होता, मात्र त्याला शंभरचा आकडा पार करता आला नव्हता. झिम्बाब्वेविरूद्धच्या तिसर्‍या वनडे सामन्यात त्याने शंभरी पार केली. आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधले पहिले शतक पूर्ण केल्यानंतर गिलने खास सेलिब्रेशन केले. ५०व्या षटकापर्यंत फलंदाजी करीत १३० धावा केल्या. त्यात १५ चौकार आणि एक षटकार मारला.

## भारतीय फुटबॉल महासंघावरील निलंबन लवकरच होणार रद्द

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काही दिवसांपूर्वी आंतरराष्ट्रीय फुटबॉल महासंघाने (फिफा) अखिल भारतीय फुटबॉल महासंघावर (एआयएफएफ) निलंबनाची कारवाई केली होती. ती कारवाई लवकरच रद्द होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या प्रकरणी सोमवारी (दि. २२) सर्वोच्च न्यायालयात एक सुनावणी झाली. एआयएफएफच्या दैनंदिन व्यवहारांवर लक्ष ठेवण्यासाठी नियुक्त केलेली तीन सदस्यीय प्रशासकीय समिती (सीओए) न्यायालयाने रद्द केली आहे. परिणामी फिफाने भारतावर लादलेले निलंबन उठवण्यासाठी निश्चित केलेल्या प्रमुख निकषांची पूर्तता झाली आहे.

न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने आपल्या तोंडी आदेशात म्हटले, एआयएफएफचे दैनंदिन व्यवस्थापनाचे काम केवळ कार्यकारी महासचिव यांच्या नेतृत्वाखालील एआयएफएफ प्रशासनाद्वारे पाहिले जाईल. याशिवाय, न्यायालयाने एआयएफएफ निवडणुकांची तारीख देखील एक आठवडा पुढे ढकलली आहे. २८ ऑगस्ट रोजी एआयएफएफ निवडणूक होणार होती. न्यायालयाच्या




आदेशानुसार, निवडणूक मतदार यादीमध्ये केवळ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांचे प्रतिनिधित्व करणार्‍या ३६ सदस्यांच्या प्रतिनिधींचा समावेश असेल.

सुनावणीदरम्यान, सीओएचे वकील गोपाल शंकरनारायण यांनी डेलॉइटने सीओएकडे सादर केलेला एआयएफएफचा अंतरिम ऑडिट अहवाल न्यायालयाला दिला. याबाबत आणखी एक अंतिम अहवाल आम्ही मागितला आहे, असे ते म्हणाले. सीओएकने अंतिम अहवाल सादर केल्यानंतर पुढील निर्णय घेतला जाईल, असे उत्तर त्यावर न्यायालयाने दिले आहे.

---

क्रिप्टो चषक बुद्धिबळ स्पर्धा

## मॅग्नस कार्लसनला हरवून प्रज्ञानंद उपविजेता


**मियामी : वृत्तसंस्था**

भारताचा युवा ग्रँडमास्टर आर. प्रज्ञानंदने पुन्हा एकदा विश्वविजेता ग्रँडमास्टर मॅग्नस कार्लसनला पराभूत केले आहे. मियामी येथील एफटीएक्स क्रिप्टो चषक बुद्धिबळ स्पर्धेमध्ये प्रज्ञानंदने कार्लसनला नमविले. मागील सहा महिन्यांच्या कालावधीतील मॅग्नसविरुद्धचा त्याचा हा तिसरा विजय ठरला आहे. या विजयासहित प्रज्ञानंद या स्पर्धेचा उपविजेता ठरला आहे.

आर. प्रज्ञानंदची एफटीएक्स क्रिप्टो चषक बुद्धिबळ स्पर्धेतील विजयाची मालिका शनिवारी खंडित झाली. पाचव्या फेरीच्या लढतीत चीनच्या क्वँग लिएम लीने प्रज्ञानंदला २.५-०.५ अशा फरकाने पराभूत केले. प्रज्ञानंदने या स्पर्धेची अप्रतिम सुरुवात करताना पहिल्या चार फेर्‍यांमध्ये अनुक्रमे अलिरझा फिरौझा, अनिश गिरी, हान्स निमन आणि लेव्हॉन अरोनियन यांच्यावर मात केली होती. पाचव्या फेरीत मात्र त्याला सर्वोत्तम खेळ करता आला नाही. या लढतीतील पहिला डाव बरोबरीत सुटल्यानंतर लिएमने दुसर्‍या आणि तिसर्‍या डावात विजयांची नोंद केली.

कार्लसन प्रज्ञानंदविरुद्धचा





सामना जिंकेल असे वाटत होते, मात्र त्याने या सामन्याच्या शेवटाकडे बर्‍याच चुका केल्या. सर्वाधिक गुणांच्या पार्श्वभूमीवर त्याला स्पर्धेचा विजेता जाहीर करण्यात आले. प्रज्ञानंदने या विजयासहित दुसरे स्थान मिळवले. या स्पर्धेमध्ये मॅग्नस कार्लसनने जेतेपद पटकाविले असून अवघ्या एका गुणाने प्रज्ञानंदला जेतेपदाने हुलकावणी दिली आहे. प्रज्ञानंदचे १५, तर विजेता ठरलेल्या कार्लसनचे १६ गुण आहेत.

या पराभवानंतरही खचून न जाता प्रज्ञानंदने दमदार पुनरागमन करीत मॅग्नस कार्लसनचा पराभव केला. यापूर्वीच्या सामन्यांमध्ये मॅग्नस कार्लसनचा यान-क्रिस्टोफ डुडाने चार डावांमधील २-२ अशा बरोबरीनंतर टायब्रेकरमध्ये २-४ असा पराभव केला होता. पाच फेर्‍यांअंती कार्लसन अग्रस्थानी कायम होता. स्पर्धा संपली तेव्हा कार्लसनचे गुण १६, तर प्रज्ञानंदचे १५ गुण होते.

## विराटचे भवितव्य त्याच्याच हाती -आफ्रिदी

**कराची : वृत्तसंस्था**

आशिया चषक स्पर्धेत भारताचा माजी कर्णधार विराट कोहली चमकदार कामगिरी करेल, अशी आशा चाहत्यांना आहे. त्याच्या फॉर्मबद्दल पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदीने नेमक्या शब्दांमध्ये विराटच्या भविष्याबाबत आपले मत मांडले आहे.

आफ्रिदीने सोशल मीडियावर चाहत्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. त्या वेळी विराटच्या फॉर्मबद्दल विचारले असता आफ्रिदी म्हणाला, ते त्याच्या स्वत:च्या हातात आहे. आफ्रिदीची ही प्रतिक्रिया सोशल मीडियावर चांगलीच व्हायरल होत आहे.

## कॅरम स्पर्धेत वेदांत राणे विजेता

**मुंबई : प्रतिनिधी**

आयडियल स्पोर्ट्स अकॅडमीतर्फे अमृत महोत्सवी स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कॅरमप्रेमी स्व. प्रल्हाद नलावडे स्मृती चषक शालेय मुला-मुलींच्या मोफत कॅरम स्पर्धेमध्ये युनिव्हर्सल हायस्कूल दहिसरचा वेदांत राणे विजेता ठरला. वेदांत राणेने वसईच्या आयझॅक न्यूटन ग्लोबल स्कूलचा श्रीशान पालवणकरचे अंतिम आव्हान १०-६ असे संपुष्टात आणून विजेतेपदाला गवसणी घातली.

स्पर्धेचे उपांत्य उपविजेतेपद कुर्ला येथील मायकल हायस्कूलचा उझमा मलिक व शुभम परमार यांनी मिळविले. अविनाश स्पार्ट्स, जयभवानी क्रीडा मंडळ चिंचपोकळी व विश्वाचा राजा दादर यांच्या सहकार्याने झालेल्या शालेय विनाशुल्क कॅरम स्पर्धेत मुंबई शहर, उपनगर, ठाणे, पालघर, पुणे, रायगड जिल्ह्यातील ८४ शालेय खेळाडूंनी भाग घेतला.

वेदांत राणे वि. श्रीशान पालवणकर यामधील



अंतिम फेरीच्या सामन्यात दोघांनीही सरळ जाणार्‍या सोंगट्याचे सातत्य राखून प्रारंभी वर्चस्व राखले. डावाच्या मध्याला ६-२ अशी श्रीशान पालवणकरने आघाडी घेऊनही निर्णायक क्षणी वेदांत राणेच्या आक्रमक अचूक खेळापुढे १०-६ अशी हार पत्करली. उपांत्य फेरीच्या सामन्यात वेदांत राणेने उझमा मलिकचा २५-० असा, तर श्रीशान पालवणकरने शुभम परमारचा २५-० असा पराभव करून अंतिम फेरीत आरामात प्रवेश केला. उपांत्यपूर्व उपविजेत्या त्रिशा गुप्ताचा विशेष गौरव करण्यात आला.

---

## मुंबई अर्ध-मॅरेथॉनमध्ये छगन, कविता विजेते



**मुंबई : प्रतिनिदी**

महाराष्ट्राच्या छगन बोंबले आणि आंध्र प्रदेशच्या कविता रेड्डीने रविवारी झालेल्या मुंबई अर्ध-मॅरेथॉनमध्ये अनुक्रमे पुरुष आणि महिला गटाचे जेतेपद मिळवले. भारताचा माजी क्रिकेटपटू सचिन तेंडुलकरने या शर्यतीच्या सुरुवातीला झेंडा दाखवला.

छगनने २१ किमीची शर्यत १ तास आणि १६.११ सेकंद अशा वेळेत पूर्ण केली. या शर्यतीत भगतसिंग वळवीने (१:१७.५१ सेकंद) दुसरे, तर अनिल जिंदलने (१:१८.२० सेकंद) तिसरे स्थान मिळवले.

महिलांमध्ये कविताने १ तास आणि ३७.०३ सेकंद अशी वेळ नोंदवत अग्रस्थान मिळवले. तन्मया करमरकर (१:४०.१८ सेकंद) आणि केतकी साठे (१:४४:५५ सेकंद) यांनी अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान पटकावले.

पुरुषांच्या १० किमी शर्यतीत अमित माळीने ३३ मिनिटे आणि ४२ सेकंद वेळेसह अव्वल स्थान पटकावले. करण शर्मा (३३:४४ सेकंद) दुसर्‍या आणि संजय झाकणे (३३:५० सेकंद) तिसर्‍या स्थानी राहिले. महिलांच्या शर्यतीत रोहिनी पाटीलने ४१ मिनिटे, ३२ सेकंद अशा वेळेसह अग्रस्थान पटकावले. प्रियंका पैकाराव (४२:२६ सेकंद) आणि प्रियंका कैलाशने (४३:५१ सेकंद) अनुक्रमे दुसरे आणि तिसरे स्थान मिळवले.

## ला लिगा फुटबॉल स्पर्धेत माद्रिदचा सेल्टा व्हिगोवर विजय

**माद्रिद : वृत्तसंस्था**

करीम बेन्झिमा, लुका मॉडरिच आणि व्हिनिसियस ज्युनियर या तारांकित खेळाडूंच्या कामगिरीच्या बळावर रेयाल माद्रिदने ला लिगा फुटबॉलमध्ये सेल्टा व्हिगोवर ४-१ असा विजय मिळवला.

या सामन्याच्या सुरुवातीपासूनच माद्रिदच्या खेळाडूंनी प्रतिस्पर्धी संघावर दडपण निर्माण केला. बेन्झिमाने (१४व्या मिनिटाला) पेनल्टीच्या साहाय्याने गोल करत माद्रिदला आघाडी मिळवून दिली. यानंतर सेल्टाकडून इगो अ‍ॅस्पसने (२३व्या मि.) गोल करीत सामना १-१ असा बरोबरीत आणला, मात्र मॉडरिचने (४१व्या मि.) गोल झळकावत मध्यंतराला माद्रिदला



२-१ अशी आघाडी मिळवून दिली.

उत्तरार्धातही माद्रिदने आपली लय कायम ठेवली. व्हिनिसियस (५६व्या मि.) आणि फेड्रिको वाल्वेर्डे (६६व्या मि.) यांनी माद्रिदच्या खात्यात आणखी दोन गोलची भर घातली. दरम्यान, सेल्टाकडून आघाडी कमी करण्याचे प्रयत्न झाले, पण त्यात त्यांना यश मिळाले नाही. त्यामुळे माद्रिदने हंगामातील सलग दुसर्‍या विजयाची नोंद केली.






---

## मराठमोळ्या ऋतुराज गायकवाडचे भन्नाट उत्तर; चाहत्यांकडून कौतुक



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघ सध्या झिम्बाब्वे दौर्‍यावर आहे. यजमान संघाविरुद्धच्या तिसर्‍या एकदिवसीय सामन्यापूर्वी भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) ऋतुराजची एक छोटीशी मुलाखत आपल्या सोशल मीडिया अकाउंटवर पोस्ट केली आहे. यातील एका प्रश्नाचे उत्तर देताना त्याने कमालीची हुशारी दाखवली. ऋतुराजच्या उत्तरामुळे सोशल मीडियावर त्याच्या हजरजबाबीपणाचे चाहते कौतुक करीत आहेत.

मुलाखतीदरम्यान, ऋतुराजला एक गोंधळात टाकणारा प्रश्न विचारण्यात आला होता. 'एमएस धोनीसह प्रशिक्षण सत्रामध्ये सराव करायला आवडेल की, सचिन तेंडुलकरसह डिनर करायला आवडेल?', असा तो प्रश्न होता. यावर ऋतुराजने क्षणाचाही उशीर न करता अतिशय हुशारीने उत्तर दिले. तो म्हणाला, मी अगोदर धोनीसह सराव करून नंतर सचिनसोबत जेवायला जाईन. याच मुलाखतीदरम्यान ऋतुराजने आपल्या काही आवडीनिवडींबद्दल सांगितले. जेव्हा राफेल नदाल आणि नोव्हाक जोकोविच या दिग्गजांपैकी एकाची निवड करण्यास सांगितले तेव्हा त्याने रॉजर फेडरर आपला आवडता टेनिसपटू असल्याचे सांगितले. याशिवाय ऋतुराजला डोसा हा खाद्यपदार्थ आवडतो. लॉर्ड्स क्रिकेट ग्राउंडवर कसोटी पदार्पण करायचे आहे, असेही त्याने सांगितले.

## वायूकुमार सुवर्ण महोत्सवी चषकाचा बाबुराव चांदेरे फाउंडेशन संघ मानकरी

**पुणे : प्रतिनिधी**

नांदेडच्या बाबुराव चांदेरे स्पोर्ट्स फाउंडेशनने वायूकुमार विकास मंडळाने सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित केलेल्या पुरुष गट राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे विजेतेपद पटकाविले. चांदेरे फाउंडेशनचा अजित चौहान स्पर्धेतील सर्वोत्तम खेळाडू ठरला.

जुवडगाव-सहाणी येथील बंदिस्त क्रीडा संकुलातील मॅटवर झालेल्या पुरुषांच्या अंतिम सामन्यात बाबुराव चांदेरे फाउंडेशनने बीडच्या शारदा प्रतिष्ठानचा ४१-२० असा सहज पराभव करीत रोख ७५ हजार ५५५ रु. व सुवर्ण महोत्सवी चषकावर आपले नाव कोरले. उपविजेत्या शारदा प्रतिष्ठानला चषक व रोख ५५ हजार ५५५ रु. वर समाधान मानावे लागले. हे दोन्ही संघ एकाच गटात होते. आक्रमक सुरुवात करीत चांदेरे फाउंडेशनने पहिल्या डावातच २२-१२ अशा १० गुणांची भक्कम आघाडी घेतली. दुसर्‍या डावातदेखील तोच जोश कायम राखत शारदा प्रतिष्ठानला पुरते नामोहरण केले. अजित चौहान, सुनील दुबिले यांच्या झंजावाती चौफेर चढाया त्याला विकास काळे व मनोज बेंद्रे यांची मिळालेली पकडीची भक्कम साथ यामुळे चांदेरे फाउंडेशनला हा



विजय मिळविण्यास सुलभ गेले. साखळी सामन्यात शारदा प्रतिष्ठानने कडवी लढत देत पहिल्या डावात आघाडी देखील घेतली होती, पण तो जोश अंतिम सामन्यात त्यांना दाखविता न आल्याने एकतर्फी पराभव पत्करावा लागला.

शाहू सडोली-कोल्हापूरच्या रोहित साठेला स्पर्धेतील उत्कृष्ट चढाईचा. शारदा प्रतिष्ठानच्या संदेश देशमुखला उत्कृष्ट पकडीचा खेळाडू ठरला, तर उदयोन्मुख खेळाडूचा मान राकेशभाऊ घुले संघाच्या विशाल ताटेने मिळविला.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणार्‍या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com